# लातूर भूकंप

LATUR BHUKAMP

संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : शुक्रवार - ७ जुलै २०२३
वर्ष - ३७ वे
अंक - १०१
पाने - ४

किंमत २ रूपये

E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com





लातूर - तिरुपती
श्री. बालाजी दर्शनासहित
A/C SLEEPER | AIR SUSPENSION
जुलै महिन्याचे वेळापत्रक
जुलै महिन्याच्या तारखा
दर मंगळवारी
4 11 18 25
दुपारी २.०० वा.
अधिक माहितीसाठी संपर्क
88888 50441
88888 45404
विश्व ट्रॅव्हल्स लातूर.


## त्यांच्या मते....

▣ राज्य मंत्रिमंडळात कॅबीनेट मंत्री म्हणून नुकतेच समाविष्ट झालेले ना. धनंजय मुंडे यांचे माजी मंत्री पंकजाताई यांनी औक्षण केले. धनंजय मुंडे यांनी पंकजाताईंना शुभेच्छा दिल्या.

-एक बातमी

- - - - - - - - - -

आता राज-उद्धव यांच्यात गळाभेट झाल्याचे फोटोही पाहायला मिळाले तर आश्चर्य वाटू नये

▣ अजितदादा मुख्यमंत्री झाले म्हणून शिवसेनेत कोणीही नाराज नाही

-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

- - - - - - - - - -

खरेच का, प्रत्येक आमदार आपआपल्या घर, कार्यालयासमोर फटाके आणि दहिहंडी फोडत आहे.

▣ शिवसेनेच्या आमदारांचा गट दोन्ही बाजुने फसला आहे. त्यांचा चेंदामेंदा झाला आहे.

- आ. बच्चू कडू

- - - - - - - - - -

अशी कडु वाळकं बच्चुभाऊच तोडू शकतात.

▣ कार्यकर्त्यांनी पक्ष कामात सतत कार्यरत रहावे, येणारा काळ भाजपाचाच असेल

- आ. प्रविण दरेकर


- - - - - - - - - -

लातूरच्या कार्यकर्त्यांसाठी वर्तमानकाळ भूत काळ ठरतोय त्याचे काय?

# विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन १७ जुलैपासून

## अधिवेशन १५ दिवसाचं

**मुंबई : महाराष्ट्र विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाची तारीख ठरली आहे. यंदाचं पावसाळी अधिवेशन १७ जुलैपासून सुरु होणार असून ते १४ ऑगस्टपर्यंत सुरु राहणार आहे. हे अधिवेशन मुंबईत पार पडणार असून १५ दिवस सुरु राहणार आहे. दरम्यान, १७ जुलै पासून सुरु होणाऱ्या पावसाळी अधिवेशनाचं कामकाज ठरवण्यासाठी सल्लागार समितीची महत्त्वाची बैठक आज पार पडली. या बैठकीला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री अजित पवार देखील उपस्थित होते.**



काही दिवसांपूर्वीच राष्ट्रवादीतून बंड करत अजित पवारांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्यांच्यासह ९ जणांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर राज्याच्या राजकारणात भूकंप आला. अजित पवारांच्या बंडानंतर मात्र राज्याच्या राजकारणाची समीकरणं बदलली आहेत. एक वर्षापूर्वी शिवसेनेत बंड झाल्यानंतर राज्यात अभूतपूर्व सत्तासंघर्ष उद्भवला होता. त्याचे पडसाद यापूर्वीच्या अधिवेशनांमध्ये पाहायला मिळाले होते. आता अजित पवारांच्या बंडानंतरही राज्याच्या पावसाळी अधिवेशनात याचे पडसाद पाहायला मिळणार आहेत.

महाविकास आघाडी सरकार कोसळल्यानंतर राज्याचं विरोधी पक्षनेते पद राष्ट्रवादीकडे होतं आणि राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार होते. पण आता अजित पवारांनीच बंड केल्यामुळे राज्याचं विरोधी पक्षनेतेपद काँग्रेसकडे जाण्याची शक्यता आहे. अधिवेशनाची तारीख जाहीर झाल्यानंतर काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी खासगी वृत्तवाहिनीशी संवाद साधला. त्यावेळी अधिवेशनाच्या आधी महाविकास आघाडीचे नेते एकत्र बैठक घेऊ, ज्याची संख्या जास्त असेल त्याला विधानसभा विरोधी पक्षनेते पद मिळेल, असं बाळासाहेब थोरात यांनी सांगितलं आहे.

# सप्टेंबर-ऑक्टोबर मध्ये स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक

मुंबई : राज्यातील जिल्हा परिषद महानगरपालिका, नगर परिषदाच्या निवडणुका आता सप्टेंबर-ऑक्टोबर २०२३ मध्ये होणार असल्याचे संकेत राज्य निवडणूक आयोगाने दिले असून १ जुलै २०२३ रोजी अस्तीत्वात असलेल्या विधानसभा मतदार याद्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत वापरण्याचे आदेश काढले आहेत.

राज्यातील २६ महानगरपालिका, २५ जिल्हा परिषदा, २०७ नगर परिषद/ नगर पंचायत, निवडणुका दोन वर्षापासून पेंडींग आहेत. वरील सर्व ठिकाणी सद्या प्रशासक आहेत. या निवडणुकीसाठी १ जुलै २०२३ अस्तीत्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार याद्या वापराबाबत राज्य निवडणूक आयोगाने आदेश दिले आहेत. बाबत राज्य निवडणूक आयोगाने आदेश दिले आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या सप्टेंबर-ऑक्टोबर २०२३ मध्ये घेण्यात येण्याची शक्यताही या आदेशात व्यक्त करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीतील ओबीसी आरक्षणाचा मुद्दा न्यायालयात आहे. त्याबाबत काय होणार याची उत्सुकता आहे.

## बसमध्ये चढताना पालकाचा खिसा कापला

औसा : औसा येथील एक पालक आपल्या मुलीला लातूरच्या शाळेत प्रवेश घेण्यासाठी म्हणून औसा टी पॉईंट येथे लागलेल्या बसमध्ये जाण्यासाठी चढत असताना चोरट्याने त्यांच्या खिशातील रोख ३० हजार ५०० रूपये चोरून नेले आहेत.

सतीश गणपती कोळी रा. औसा हे आपल्या भाच्चीला लातूरच्या शाळेत प्रवेश घेण्यासाठी म्हणून तिच्यासह बसमध्ये चढत असताना चोरट्यांनी पालकाच्या खिशावर डल्ला मारला.

## देऊळवाडीत घरफोडी; ११.५२ लाखाचा ऐवज चोरीला

वाढवणा : मौजे देऊळवाडी, ता. उदगीर येथील हनमंत देवीदास केंद्रे यांचे घरात प्रवेश करून चोरट्यांनी घरातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ११ लाख ५२ हजार रूपयांचा ऐवज चोरून नेला आहे. या प्रकरणी वाढवणा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मला ब्रेक हवाय, दोन महिने राजकारणातून सुट्टी घेतेय : पंकजा

मुंबई : मी कायमच पक्षाचा आदेश अंतिम मानला आहे. मी पक्षाच्या विरोधात जात नाही मग माझ्या नैतिकतेवर प्रश्न उपस्थित का केले जातात? असा सवाल उपस्थित करत माझ्या नैतिकतेवर प्रश्न निर्माण करणे हे माझ्यासाठी दु:खद आहे, अशी प्रतिक्रिया भाजपच्या नेत्या पंकजा मुंडे यांनी दिली. मला राजकारणातून ब्रेक हवा आहे. सध्याच्या राजकारणाचा कंटाळा आल्यामुळे दोन महिने राजकारणातून सुट्टी घेत आहे, असंही पंकजा मुंडे म्हणाल्या. मुंबईतील पत्रकार परिषदेत पंकजा मुंडे बोलत होत्या.

पंकजा मुंडे यांच्या काँग्रेस प्रवेशाच्या चर्चेने जोर धरल्यानंतर पंकजा मुंडे यांनी स्पष्टीकरण देत मी भाजप सोडून कुठल्याच पक्षात जाणार नसल्याचं सांगितलं. मी नाराज आणि पक्षाच्या बाहेर जाणार अशी चर्चा होते. मी भाजपमध्येच राहणार आहे. राहुल आणि सोनिया गांधी यांना भेटले नाही. माध्यमांनी चुकीची बातमी दाखवली. ही बातमी दाखवणाऱ्या संबंधित वृत्तवाहिनीवर मी मानहानीचा दावा ठोकणार आहे, असंही पंकजा मुंडे म्हणाल्या. जेव्हा जेव्हा तिकीट दिलं नाही, तरीही मी प्रतिक्रिया दिली नाही. मी पक्षाच्या विरोधात जात नाही मग माझ्या नैतिकतेवर प्रश्न का उपस्थित करता, असा प्रश्न पंकजा मुंडे यांनी विचारला.

गेल्या काही दिवसात अनेक पक्षांनी, कार्यकर्त्यांनी मला ऑफर दिली. पण बातमी आली की मी राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांची भेट घेतली आणि मी काँग्रेसच्या वाटेवर आहे. एका सांगलीच्या नेत्याच्या माध्यमातून मी काँग्रेसच्या वाटेवर असल्याचं सांगितलं. माध्यमांनी बातमी देताना स्रोत कोणता आहे हे सांगावं, त्यामुळे मी संबंधित चॅनलवर मानहानीचा खटला दाखल करणार आहे. माझं करिअर कवडीमोलाचं नाही. २० वर्षांपासून मी राजकारणात आहे. पाठीत खंजीर खुपसण्याचं रक्त माझ्या अंगात नाही. त्यामुळे पंकजा मुंडे पात्र असतील, अपात्र असतील त्याची उत्तरं पक्षाने दिली पाहिजेत. मी सार्वजनिकरित्या नाराजी व्यक्त केली नाही. मागील विधानपरिषदेला दोन्ही वेळेला मला फॉर्म भरुन ठेवायला सांगितले. सकाळी ९ वाजता मला फॉर्म भरायला यायला सांगितलं. त्यानंतर तुम्ही फॉर्म भरायचा नाही असं सांगितलं. मी माझ्या पक्षाचा आदेश अंतिम मानला. मी पक्षाविरोधात असं काय केली की माझ्या नैतिकतेविरोधात प्रश्न्न उपस्थित केले जातात, असा सवाल पंकजा मुंडे यांनी उपस्थित केला.

## कंझ्युमर फेडरेशनमध्ये चोरी

लातूर : लातूर येथील सुनील कॉम्प्लेक्स फ्रूट मार्केटमध्ये असलेल्या महाराष्ट्र स्टेट को. ऑप. कंझ्युमर फेडरेशन लि. मुंबई विभागीय कार्यालय लातूरच्या कार्यालयाच्या शटरचे कुलूप तोडून चोरी करण्यात आली आहे.

चोरट्याने या कार्यालयाच्या कॅबीनमधील कपाटात ठेवलेले रोख ९ हजार ३६६ रूपये चोरून नेले आहेत. या प्रकरणी माधव संपतराव बिराजदार यांच्या फिर्यादीवरून गांधी चौक पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गुजरात हायकोर्टानं राहुल गांधींची पुनर्विचार याचिका फेटाळली

गांधीनगर : मोदी आडनाव मानहानी प्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधी यांची गुजरात हायकोर्टानं पुनर्विचार याचिका फेटाळली आहे. राहुल गांधींना कोर्टाने कोणाताही दिलासा दिला नाही. कोर्टाच्या निर्णयमुळे राहुल गांधींची खासदारकी रद्दच राहणार आहे. राहुल गांधीसाठी हा एक मोठा धक्का मानला जात आहे.

राहुल गांधी यांना सूरत न्यायालयानं दोषी ठरवून २३ मार्च रोजी दोन वर्षांची शिक्षा सुनावली होती. गुजरात हायकोर्टाने ती शिक्षा कायम असणार आहे.

कर्नाटकमध्ये मागील लोकसभा निवडणुकीतील (२०१९) प्रचारावेळी राहुल यांनी मोदी आडनावाविषयी टिप्पणी केली. त्याबद्दल गुजरातमधील भाजपचे आमदार पुर्णेश मोदी यांनी राहुल यांच्या विरोधात मानहानीचा दावा दाखल केला. त्याप्रकरणी सुरतमधील न्यायदंडाधिकारी न्यायालयाने राहुल यांना दोषी ठरवले. त्यांना दोन वर्षे तुरूंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली. त्यामुळे त्यांची खासदारकी रद्द झाली होती. सुरत न्यायालयाने दिलेल्या दोन वर्षाच्या शिक्षेला स्थगिती द्यावी ही याचिका सत्र न्यायालयाने फेटाळल्यानंतर राहुल गांधी यांनी गुजरात उच्च न्यायालयात अपील केलं होतं.

राहुल गांधींकडे सध्या दोन पर्याय आहेत. राहुल गांधी हायकोर्टाच्या मोठ्या घटनापीठाकडे जाऊ शकतात किंवा थेट ते सुप्रीम कोर्टात जाऊ शकतात. राहुल गांधींचे खासदार म्हणून निलंबन देखील कायम राहणार आहे. जोपर्यंत स्थगिती मिळत नाही तोपर्यंत खासदारकी मिळणे अवजड आहे. संसदेचे पावसाळी अधिवेशन १३ दिवसांनंतर आहे. संसदेचे



पावसाळी अधिवेशन २० जुलै ते ११ ऑगस्ट या कालावधीत होणार आहे. पावसाळी अधिवेशनाच्या अगोदर काँग्रेस वरच्या कोर्टात जाणार का? काय हालचाली करणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. येत्या २३ जुलैला राहुल गांधी यांची खासदारकी रद्द होऊन चार महिने पूर्ण होतील. तसेच येणाऱ्या वायनाडच्या पोटनिवडणुकीबाबत काय होणार? हे देखील पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे

राहुल गांधी यांनी २०१९ मधील लोकसभा निवडणुकांच्या प्रचारादरम्यान कर्नाटकात आपल्या भाषणात म्हटलं होतं की, 'सगळ्या चोरांचं आडनाव मोदी का आहे?' यावरुन भाजपचे नेते पूर्नेश मोदी यांनी सूरत कोर्टात त्यांच्या विरोधात मानहानीची तक्रार दाखल केली होती. त्यांनी म्हटलं होतं की, 'राहुल गांधींनी असं म्हणत मोदी आडनाव असलेल्या लोकांची बदनामी केली आहे.'

भारतीय दंड संहिता कलम ४९९ आणि ५०० अंतर्गत राहुल गांधींना दोषी ठरवणाऱ्या मुख्य न्यायदंडाधिकारी एचएच वर्मा यांच्या न्यायालयानेही त्यांना जामीन मंजूर केला आणि उच्च न्यायालयात अपील करण्याची मुभा देण्यासाठी ३० दिवसांची शिक्षा स्थगित केली होती.

# दरोडेखोरांच्या कुख्यात टोळीस मोक्का

लातूर : लातूर शहरातील डी मार्ट शेजारी एका अपार्टमेंटवर सशस्त्र दरोडा टाकून झालेल्या दरोडेखोराच्या कुख्यात टोळीस पोलिसांनी पाठलाग करून रेणापूर शिवारातील उसाच्या फडातून पकडले होते. त्या टोळीस मोक्का लावण्यात आला आहे. या टोळीने राज्यात विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीत सशस्त्र दरोडे टाकले आहेत.

१५ मे २०२३ रोजी आंबेजोगाई रोड, डी मार्ट जवळ असलेल्या अपार्टमेंट वर सशस्त्र दरोडेखोराने दरोडा टाकल्याची माहिती पेट्रोलिंग वरील पोलिसांना समजली होती. त्यावेळी स्थानिक गुन्हे शाखा आणि लातूर शहरातील सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व अमलदारांनी तात्काळ घटनास्थळी पोहोचून दरोडेखोरांचा पाठलाग करून त्यांना काही तासातच मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले होते.

गुन्ह्याचा तपास करीत असताना सदरचे दरोडेखोरांनी लातूर जिल्ह्यात पाच ठिकाणी तसेच महाराष्ट्र राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी टोळी तयार करून सशस्त्र दरोड्याचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले होते. दरोडा,जबरी चोरी सारखे अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली होती. यांच्याकडे गुन्ह्या बाबत सखोल तपास करुन नमूद गुन्ह्यातील आरोपी हे टोळी करून टोळीने गुन्हे करणारे तरबेज, सराईत,धाडसी, कुख्यात व सक्रिय गुन्हेगार असून त्यांनी लातूर जिल्ह्यातील पोलीस ठाणे रेनापुर, पोलीस ठाणे गांधी चौक व विवेकानंदचौक तसेच महाराष्ट्रातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्वत:च्या आर्थिक लाभासाठी, संघटितपणे, वेगवेगळे साथीदार घेऊन टोळी निर्माण करून हिंसाचाराचा वापर व कट करून स्वत:चे व टोळीतील साथीदाराचे आर्थिक फायदा करिता सशस्त्र दरोड्याचे गुन्हे करणे, जीवे मारणे, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे,घातक हत्याराने दुखापत करून लोकांच्या जीवितास व मालमत्तेस धोका निर्माण केल्याचे निष्पन्न झालेने त्यावरून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी नमूद आंतरजिल्हा दरोडेखोरांच्या टोळीविरुद्ध मोक्का (MCOCA) सारख्या कठोर कायद्याप्रमाणे कार्यवाही करणेबाबत सूचना दिलेल्या होत्या.

त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) भागवत फुंदे, यांच्या मार्गदर्शनाखाली विवेकानंद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांनी सदरील दरोडेखोराविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ (MCOCA) अन्वये कलम वाढ करण्याबाबत परवानगी मिळण्यासाठी चा प्रस्ताव पाठविलेला होता .

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली संघटित गंभीर गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांच्या विरुद्ध मोक्का अंतर्गतची ही लातूर जिल्ह्यातील अलीकडच्या काळातील दुसरी मोठी कारवाई आहे.

या गुन्ह्यातील नमूद आरोपी पुढीलप्रमाणे आहेत. महेश आसाराम चव्हाण, राहणार गेवराई, नितीन संजय काळे उर्फ बापू टांग्या काळे, राहणार अहमदनगर, विकास रामभाऊ भोसले, राहणार बीड, रवींद्र संजय काळे, राहणार अहमदनगर, एक विधी संघर्ष बालक असून एक आरोपी मात्र अद्याप फरार आहे.

गुन्ह्याचा पुढील तपास विशेष पोलीस उपमहानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र नांदेड डॉ.शशिकांत महावरकर, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉक्टर अजय देवरे यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर भागवत फुंदे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे, विवेकानंद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर व त्यांच्या पथकातील पोलीस उपनिरीक्षक बालाजी गोणारकर, विधी सल्लागार ॲड. सारिका वायबसे, पोलीस अंमलदार संतोष खांडेकर, पांडुरंग सगरे यांनी केली आहे.




## वंचित बहुजन आघाडीचा जनआक्रोश मोर्चा

परळी येथील जरीन खानचा पोलीस कोठडीत खून करणाऱ्या कर्मचाऱ्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा. जरीन खानच्या कुटुंबियांना ५० लाखांची मदत द्यावी, नांदेड जिल्ह्यातील बोंढार गावच्या अक्षय भालेराव यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा द्यावी, रेणापूर येथील मातंग बांधवाचा खून करणाऱ्यांना फाशी द्यावी, आदी मागण्यांसाठी आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क ते जुने जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. डॉ. तात्याराव वाघमारे, सुनील क्षीरसागर, ॲड. रोहीत सोमवंशी या पदाधिकाऱ्यांनी मोर्चाचे नेतृत्व केले.


# विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांचा शिवसेनेत प्रवेश

मुंबई : विधानपरिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे यांनी आज दुपारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला.

उद्धव ठाकरे यांच्या गटाला आणखी एक मोठा धक्का बसणार आहे. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. नागपूर अधिवेशनापासूनच याची सुरुवात झाली होती. उद्धव ठाकरे नागपुरात दाखल होताच, काही आमदारांनी नीलम गोऱ्हे यांची तक्रार केली होती. नीलम गोऱ्हे या उपसभापती असूनही आपल्याला बोलू देत नाहीत. आदित्य ठाकरेंच्या मुद्द्यावर ज्यावेळी अधिवेशनात सत्ताधाऱ्यांनी उद्धव ठाकरे गटाला घेरलं होतं. त्यावेळी उपसभापती म्हणून नीलम गोऱ्हे यांनी आपल्या आमदारांना बोलू द्यायला हवं होतं, असं आमदारांचं म्हणणं होतं. त्यावेळी उद्धव ठाकरेंनीही नीलम गोऱ्हेंना खडे बोल सुनावले होते, अशी माहितीही समोर आली होती. त्यानंतर नीलम गोऱ्हेंचा शिंदे गटाकडे ओढा वाढत गेला. मुख्यमंत्र्यांसोबतच्या कार्यक्रमांना त्या प्रोटोकॉल म्हणून उपस्थित असायच्या. तसेच, काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांनी नीलम गोऱ्हेंच्या पुण्याच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली होती. तेव्हापासूनच नीलम गोऱ्हे शिंदे गटात जाणार असल्याच्या चर्चा रंगल्या होत्या. आज अखेर दुपारी नीलम गोऱ्हे शिवसेनेत प्रवेश केला. तसेच, नीलम गोऱ्हेंसह ठाकरे गटातील आणखी दोन पदाधिकारी यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

ठाकरेंच्या शिवसेनेचे विधानपरिषदेत ११ आमदार आहेत. त्यापैकी विप्ल व बाजोरिया हे आधीच एकनाथ शिंदेंसोबत गेले आहेत. काही दिवसांपूर्वी मनिषा कायंदेही ठाकरेंची साथ सोडून शिंदेंकडे गेल्या आहेत. विधानसभेचे ४० आमदार आधीपासूनच एकनाथ शिंदेंकडे आहेतच, आता विधानपरिषदेचेही ३ आमदार शिंदेंकडे गेले आहेत. त्यामुळे आता विधानपरिषदेतील शिवसेनेचं ठाकरे गटाचं जे संख्याबळ आहे, हे ११ वरुन कमी झाल्याचं पाहायला मिळत आहे.

बंडाच्या एक वर्षानंतरही



ठाकरेंकडून शिंदेंच्या शिवसेनेत येणाऱ्यांचा ओघ काही कमी होण्याचं नाव घेत नाही. काही दिवसांपूर्वी शिवसेना नेत्या मनीषा कायंदेंनी शिंदे गटात प्रवेश केला. मनीश कायंदेंनी शिंदे गटात प्रवेश करताच त्यांच्यावर विश्र्वास दाखवत एकनाथ शिंदेंनी मोठी जबाबदारीही सोपवली. एकनाथ शिंदेंनी मनिषा कायंदेंची शिवसेना सचिव आणि पक्षप्रवक्तेपदी केली नियुक्ती केली आहे.

# धोनी शेतात करतो सेंद्रिय शेती

जगातील सर्वात यशस्वी कर्णधारांपैकी एक, भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आणि रांचीचा राजकुमार महेंद्रसिंग धोनी ७ जुलै रोजी आपला ४२ वा वाढदिवस साजरा करणार आहे. माहीचा क्रिकेटशी असलेला संबंध आणि त्याचे यश साऱ्या जगाने पाहिले आहे. क्रिकेट हे धोनीचे पहिले प्रेम आहे असे म्हटले जाते, पण याशिवाय धोनीच्या इतर छंदांबद्दल बोलायचे झाले तर त्याचे वाहनांवरील प्रेम सर्वात आधी येते. वाहनांच्या कलेक्शनमध्ये धोनीकडे Hummer H-2, Porsche 911, Ferrari GT-5990, Jeep Grand Cherokee Trackhawk, Land Rover 3, -udi Q7, Confederate Hellcat X32, Harley Davidson Fatboy, Kawasaki Ninja ZX 14 यासह सुमारे दोन डझन वाहने आहेत. विविध कंपन्यांच्या बाईक्स आणि लक्झरी कार त्याच्या ताफ्यात आहेत.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर धोनीने सेंद्रिय शेतीला चालना देण्याच्या उद्देशाने रांचीच्या नगडी पोलीस स्टेशन हद्दीतील सेंबो गावात ईजा फार्म नावाच्या ४३ एकर परिसरात सेंद्रिय शेती सुरू केली. स्ट्रॉबेरी, सिमला मिरची, ड्रॅगन फ्रूट, टरबूज, दुधी, भेंडी, ब्रोकोली, टोमॅटो आणि इतर अनेक भाज्यांसह अनेक प्रकारच्या भाज्यांची मोठ्या प्रमाणावर आणि सेंद्रिय पद्धतीने माहीच्या शेतात लागवड केली जाते.

**फार्ममध्ये पाळली जाते कडकनाथ जातीची कोंबडीही**

यासोबतच धोनीच्या फार्ममध्ये कडकनाथ प्रजातीची कोंबडी मोठ्या प्रमाणात पाळली जात आहे. मात्र, काही महिन्यांपूर्वी बर्ड फ्लूची लागण झाल्याने अनेक कोंबड्या नष्ट झाल्या होत्या. कडकनाथ कोंबडी व्यतिरिक्त, धोनीच्या फार्ममधून अंडी देखील मोठ्या प्रमाणात पुरवली जातात, जी ईजा फार्मच्या व्हॉट्सअॅप ग्रुप नंबरवर ऑर्डर



देऊन सहज मिळवता येतात. यासोबतच इजा फार्मच्या आउटलेटवरही त्याची विक्री केली जाते.

धोनीच्या फार्ममध्ये कुक्कुटपालनाव्यतिरिक्त भारतीय जातीच्या सुमारे ३०० गायी, देशी गिर गाय, सेहवाल आणि फ्रिसन जातीच्या गायींचे पालनपोषण करण्यात येते, ज्यांचे दूध ईजा फार्मच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर किंवा ईजा फार्मच्या स्टोअरवरून ऑर्डर करून सहज खरेदी करता येईल. यासोबतच घरपोच दुधाचीही व्यवस्था दुकानातून केली जाते. भाजीपाला, फळे आणि कुक्कुटपालन केल्यानंतर धोनी आता आपल्या शेतात मासे पाळत आहे. मत्स्यशेतीसाठी खास दोन मोठे तलाव बांधण्यात आले असून, त्यामध्ये रहू, कटला आणि तेलपिया नावाच्या माशांच्या प्रजातींचे संगोपन केले जात आहे. माशांचा आकार लहान असल्याने त्यांची खरेदी-विक्री सध्या होत नाही.

**धोनीच्या गावात आहे ४३ एकरमध्ये फार्म हाऊस**

महेंद्रसिंग धोनीच्या सैंबो गावात ४३ एकरांवर पसरलेल्या शेतात उगवलेली भाजीपाला आणि फळे ईजा फार्म नावाच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर ऑर्डर देऊन किंवा ईजा फार्म नावाच्या ओपन आउटलेटला भेट देऊन सहजपणे मिळवता येतात. राजधानी रांची येथील लालपूर येथील सुजाता चौक आणि इजा फार्मच्या दुकानांव्यतिरिक्त डेली मार्केटमध्ये असलेल्या दुकानातून फळे आणि भाजीपाला विकला जात आहे.

**शेतीचे काम सांभाळतो धोनीचा मोठा भाऊ नरेंद्र सिंग**

यासोबतच धोनीच्या शेतात पिकवलेली फळे आणि भाजीपाला ऑल सीझन फार्म फ्रेश एजन्सीमार्फत दुबई आणि इतर आखाती देशांमध्ये पाठवला जातात. धोनीच्या इजा फार्ममध्ये सध्या सुमारे १५० लोक काम करत आहेत. धोनीचा मोठा भाऊ नरेंद्रसिंग धोनी आणि त्याचे जवळचे मित्र फार्म हाऊसची जबाबदारी सांभाळत आहेत.

# माहिती कामाची : सिलिंडरमधून गॅस गळती सुरू झाल्यास या चार गोष्टी करा, टळू शकते मोठी दुर्घटना



Image Credited - SUPERGAS

एक काळ असा होता, जेव्हा लोक केवळ ग्रामीण भागातच नव्हे तर शहरांमध्येही लाकडाच्या चुलीवर अन्न शिजवायचे. पण आता त्यात बरीच कपात दिसून येत आहे, कारण आता दुर्गम खेड्यातही लोक गॅस सिलिंडर वापरून अन्न बनवतात. एलपीजी गॅस सिलिंडर सुरू झाल्यामुळे लोकांनाही मोठ्या प्रमाणात सुविधा मिळाल्या आहेत. तुम्ही कॉलवर किंवा ऑनलाइन गॅस सिलिंडर बुक करू शकता आणि ते थेट तुमच्या घरी पोहोचवू शकता. या सगळ्यात अनेकवेळा अशी प्रकरणे समोर येतात, ज्यामध्ये गॅस गळती होते. अशा परिस्थितीत गॅस गळती झाल्यास काय करावे हे जाणून घेतले पाहिजे, जेणेकरून मोठी दुर्घटना होण्याआधीच टाळता येईल. चला तर मग, जाणून घेऊया गॅस सिलेंडर लीक झाल्यावर तुम्ही काय करावे ते.

**गॅस गळती झाल्यास काय करावे?**

जेव्हा जेव्हा गॅस गळती होते, तेव्हा चुकूनही माचिस पेटवायच्या भानगडीत पडू नका आणि लाईटचा स्विचही चालू करु नका. असे केल्यास आग लागू शकते. फक्त घराचे दरवाजे आणि खिडक्या काळजीपूर्वक उघडा, जेणेकरून आत गॅसमुळे गुदमरल्यासारखे होणार नाही.

गॅस गळती झाल्यास, आपण ताबडतोब रेग्युलेटर बंद केले पाहिजे, ज्यामुळे गॅस गळती थांबते. पण जर तसे झाले नाही, तर तुम्ही सिलेंडरमधून रेग्युलेटर काढून सिलेंडरवर सेफ्टी कॅप लावावी. यामुळे गॅस गळती थांबते.

जेव्हा तुमचा गॅस सिलेंडर गळत असेल, तेव्हा तुमच्या गॅस एजन्सीला कळवा. त्यांना सांगा की त्यांनी दिलेल्या सिलेंडरमधून गॅस गळत आहे. यानंतर एजन्सीद्वारे तुमचे सिलेंडर बदलले जाते. सिलिंडर घेताना फक्त लक्षात ठेवा आणि लिकेज तपासा.

जर काही कारणास्तव गॅस गळतीनंतर सिलिंडरला आग लागली, तर तुम्हाला अजिबात घाबरण्याची गरज नाही. तुम्हाला जाड चादर किंवा ब्लँकेट पाण्यात भिजवावे लागेल आणि ते सिलेंडरवर गुंडाळावे लागेल. असे केल्याने आग विझवता येते.

# शिकवणी वर्ग वाजवणार महाविद्यालयांची मृत्यूघंटा!

काही महाविद्यालयांच्या सोबत शिकवणी वर्गांनी करार केले आहेत. शिकवणीच्या वर्गासाठी मोजल्या जाणार्या पैशांतील काही हिस्सादेखील महाविद्यालयांना दिला जात असल्याचे बोलले जात आहे. शिक्षण हा अलीकडे धंदा होत असल्याच्या अनेक घटना माध्यमांतून समोर आल्या आहेत. ही अत्यंत चिंतेची बाब आहे. खरंतर शासनाने या गोष्टींकडे गांभीर्याने पाहायला हवे. असे प्रकार रोखण्यासाठी कठोर पावले उचलण्याची गरज आहे. तरच या गोरखधंद्याला चाप बसेल. महाविद्यालयांना काहीच न करता पैसा मिळत असल्याने आज हे फार लाभदायी वाटत असेल, पण ही महाविद्यालयांसाठी मृत्यूघंटा ठरण्याची दाट शक्यता आहे.

राज्यात कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यायचा आणि देशात व राज्यात इतरत्र महानगरात शिकवण्याचे वर्ग लावायचे या प्रकारात दिवसेंदिवस वाढ होत आहे. आपल्या पाल्याला अभियंता, डॉक्टर बनवायचे आहे म्हणून पहिलीच्या वर्गापासून शिकवणीला पाठविणार्या पालकांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. राज्यातील विविध सर्वेक्षणानुसार यात सातत्याने वाढ होत असल्याचे चित्र समोर आले आहे. अलीकडे कनिष्ठ महाविद्यालये आणि शिकवणी वर्गाचे व्यवस्थापन यांच्यात जणू अलिखित करार झाले आहेत. आज विद्यार्थी महाविद्यालयात शिकत नाही, मात्र त्यांना परीक्षेला प्रविष्ठ होण्यासाठी प्रवेश घ्यावा लागतो म्हणून विद्यार्थी प्रवेश घेतात. त्यासाठी महाविद्यालयांना मुबलक पैसे मिळतात. कोणत्याही खर्चाशिवाय भरमसाठ पैसा मिळत असल्याने हा प्रवास काहीसा छान वाटत आहे. आज हे पैसे मिळवून देणारे साधन वाटत असले तरी ही पाऊलवाट उद्या कनिष्ठ महाविद्यालयांचे अस्तित्वच संपुष्टात आणण्याचा धोका आहे. ही वाट म्हणजे शिक्षणाच्या भविष्यावर येणार्या अंधाराची चाहूल आहे. यासंदर्भाने दैनिक महानगरने हा गंभीर प्रश्न चव्हाट्यावर आणल्यानंतर शिक्षणात आता गंभीर पावले उचलण्याची गरज व्यक्त होऊ लागली आहे.

मुळात आपल्याकडे शिक्षणाच्या प्रक्रियेतून समाज





परिवर्तन अपेक्षित आहे. त्यासाठी शाळा, महाविद्यालयांची निर्मिती करण्यात आली आहे. मुलांचे शिक्षण होण्यासाठीचे प्रयत्न शाळांनी करणे अपेक्षित आहेच. अलीकडे पालकांच्या मनात बालकांच्या समृद्ध शिक्षणापेक्षा त्यांच्या मार्कांचेच अधिक आकर्षण आहे. आपला पाल्य शाळा-महाविद्यालयात गेल्यानंतर काय आणि किती शिकला? यापेक्षा त्याला मार्क किती मिळाले हे महत्त्वाचे मानले जात आहे. जीवनात अपयश आले तरी चालेल, मात्र परीक्षेत घवघवीत यश मिळायला हवे. त्यासाठी पालक कोणताही त्याग करायला तयार आहेत. पालकांनी निवडलेला हा मार्ग विद्यार्थ्यांविषयी आणि त्यांच्या भविष्याविषयीचे प्रेम आहे की उद्याच्या त्यांच्या स्थिरस्थावर होण्याविषयीची चिंता आहे, हा खरा प्रश्न आहे. शिक्षणातून आपल्याला जगण्यासाठी सक्षम नागरिक निर्माण करायचा आहे. मानवाचे माणसात रूपांतर करण्याचा विचार शिक्षणात आहे. शिक्षणातून माणसात शहाणपण आणि विवेकाची पेरणी करायची आहे. जगण्याच्या प्रवासात ज्या समस्या निर्माण होतात त्या प्रश्नांना सामोरे जाण्याची हिंमत शिक्षणाने पेरण्याची अपेक्षा असते.

शिक्षणातील हा मूलभूत विचारच आता हरवत चालला आहे. शिक्षणात ज्ञानापेक्षा केवळ मार्क मिळून देणारी व्यवस्था उभी करणे आणि त्या दिशेने प्रवास करणे पालकांना महत्त्वाचे वाटू लागले आहे. त्यासाठी पालक आपल्या पाल्याला महाविद्यालयात केवळ प्रवेश घ्यायचा आणि त्याला शिकवणीला पाठवणे महत्त्वाचे वाटत होते. आपल्याकडे कधीकाळी शिकवणीला पाठवणे म्हणजे विद्यार्थ्याच्या शिकण्यात गती कमी आहे, त्याच्या शिक्षणात अडथळे आहेत असे समजले जात होते. शाळा, महाविद्यालयात शिकवले जात असतानादेखील विद्यार्थी शिकवणीला जातो हे त्या कुटुंबासाठी अप्रतिष्ठेचे मानले जात होते. आपल्या शाळा-महाविद्यालयाचा विद्यार्थी शिकवणीला जातो हे शाळांना आणि शिक्षकांना अपमानजनक वाटत होते. विद्यार्थी शिकवणीला जातो म्हणजे आपल्या अध्यापन प्रक्रियेत दोष आहेत असे शिक्षक मानत होते. संस्थाचालकही संबंधित शिक्षकाला त्यासंबंधीची समज देत होते, मात्र अलीकडे सारेच संदर्भ बदलले आहेत. आपला पाल्य शिकवणीला जातो हीच बाब आता प्रतिष्ठेची वाटू लागली आहे.

राज्यात सातत्याने शिकवणीला जाणार्या विद्यार्थ्यांची संख्या उंचावत आहे. असर अहवालानुसार पहिलीतील १०.२ टक्के, दुसरीत १३.६ टक्के, तिसरीत १५.४ टक्के, चौथीत १६.३ टक्के, पाचवीत १६.९ टक्के, सहावीत १६.२ टक्के, सातवीत १५.९ टक्के, तर आठवीत १६.१ टक्के विद्यार्थी शिकवणीत सहभागी झाले आहेत. सरासरी पहिली ते आठवीतील १५.१ टक्के विद्यार्थी शिकवणीत सहभागी झाले आहेत. यातील आकडेवारीवर नजर टाकली तर खासगी शाळेत शिकणार्या विद्यार्थ्यांचे शिकवणीत सहभागी होणार्या विद्यार्थ्यांचे प्रमाण २१ टक्के इतके आहे. सरकारी शाळेत प्रवेश घेणार्या आणि तरी शिकवणीला जाणार्या विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण १२.५ टक्के इतके आहे. यातील पहिलीत शिकणार्या सरकारी शाळेतील ८.० टक्के विद्यार्थी, तर खासगी शाळेतील २०.९ टक्के विद्यार्थी शिकवणीला जातात. दुसरीत शिकणार्या सरकारी शाळेतील ११.१ टक्के विद्यार्थी शिकवणीत सहभागी आहेत, तर खासगी शाळेतील २६.२ विद्यार्थी शिकवणीला जात आहेत. या आलेखावर नजर टाकली तर खासगी शाळेतील सर्वाधिक विद्यार्थी शिकवणीत सहभागी आहेत.

खासगी शाळेतील तिसरीतील २९.६ टक्के, चौथीतील २९.२ टक्के, पाचवीतील २०.९ टक्के, सहावीतील १९.३ टक्के, सातवीतील १९.८ टक्के, आठवीतील १६.५ टक्के विद्यार्थी शिकवणीला पैसे मोजून सहभागी होत आहेत. राज्यातील हे प्रमाण गेल्या काही वर्षांत सातत्याने वाढत आहे. २०१० साली सरकारी शाळेतील ६ टक्के आणि खासगी शाळेतील १५.३ विद्यार्थी सहभागी होत होते. आता २०२२ मध्ये म्हणजे गेल्या १२ वर्षांत सरकारी शाळेतील १२.५ टक्के आणि खासगी शाळेतील २१.० विद्यार्थी शिकवणीत सहभागी होत होते. सरकारी शाळेतील शेकडा प्रमाण ६.२ टक्के, तर खासगी शाळेतील ५.७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. खासगी शाळा म्हणजे गुणवत्ता अशी आपल्या समाजमनाची धारणा आहे, मात्र तेथील वाढते प्रमाण चिंताजनक मानायला हवे. दहावी आणि बारावीच्या बहुतांश विद्यार्थी शाळांपेक्षा शिकवणी पसंत करीत आहेत. महानगरे, शहरी भागात तर हे प्रमाण निम्म्यापेक्षा अधिक आहे. ग्रामीण भागात काही प्रमाणात वाढ होताना दिसत आहे.

प्राथमिक, माध्यमिकबरोबर कनिष्ठ महाविद्यालयात आता नवा पायंडा पाडला जात आहे. विद्यार्थी अभियंता, मेडिकलला प्रवेश घेण्यासाठी नीट, जेईईसारख्या परीक्षांमध्ये अधिकाधिक वरचे स्थान मिळविण्याची गरज आहे. त्यासाठी देशात आणि अलीकडे राज्यातदेखील काही शहरांमध्ये शिकवणी वर्ग प्रसिद्ध झाले आहेत. त्यामुळे विद्यार्थी स्थानिक महाविद्यालयात प्रवेश घेतात आणि शिकवणीसाठी मात्र महानगरात किंवा अगदी परराज्यात प्रवेश घेतात. अनेक महाविद्यालये अशा स्वरूपात प्रवेश देत आहेत. यासाठी ते हजारो रुपये घेत आहेत हे विशेष. ही फी तालुक्याच्या ठिकाणी लाखावर पोहचली आहे. काही महाविद्यालयांच्या सोबत शिकवणी वर्गाने करार केले आहेत. शिकवणीच्या वर्गासाठी मोजल्या जाणार्या पैशांतील काही हिस्सादेखील महाविद्यालयांना दिला जात असल्याचे बोलले जात आहे. शिक्षण हा अलीकडे धंदा होत असल्याच्या अनेक घटना माध्यमांतून समोर आल्या आहेत. ही अत्यंत चिंतेची बाब आहे. खरंतर काही वर्षांपूर्वी राज्य सरकारने विज्ञान शाखेत शिकणार्या प्रत्येक विद्यार्थ्याला थम मशिनद्वारे हजेरी नोंद करण्याची सक्ती केली होती, मात्र त्याला काही ठिकाणी विरोध झाला.

शिक्षणातील गोरखधंदा बंद होण्याची भीती या शासन निर्णयामागे असल्याने शंभर टक्के महाविद्यालयात ती राबविली गेली नाही. खरंतर शासनाने या निर्णयाची सक्ती करीत प्रभावी अंमलबजावणी केली असती तर मोठ्या प्रमाणावर सुरू असणार्या गोरखधंद्याला चाप बसला असता. महाविद्यालयांना काहीच न करता पैसा मिळत असल्याने आज हे फार लाभदायी वाटत असले तरी ही महाविद्यालयांसाठी मृत्यूची घंटा ठरण्याची शक्यता आहे. अशा स्वरूपात ही प्रक्रिया होत असेल तर उद्या शिकवणी वर्गाला अधिकृत मान्यता दिली तर शासनाची महाविद्यालयांवर होणार्या खर्चात बचत होईल. त्याचवेळी विद्यार्थी दहावी पास असेल तर त्याला बारावीला बाह्य परीक्षेद्वारे प्रविष्ठ होण्याची अनुमती दिली गेली. विज्ञान शाखेतील विद्यार्थी असेल तर त्याला प्रात्यक्षिक परीक्षांसाठी केंद्र निर्माण केली तर महाविद्यालयांचे भविष्य काय असेल? हे असेच सुरू राहिले तर शासन आज नाही तर उद्या यावर निर्णय घेतल्याशिवाय राहणार नाही. आता या पर्यायाचा विचार करण्याची वेळ आली आहे. या माध्यमातून होणारी फसवणूक आज समाजाला आणि पाल्यांनादेखील आपल्या हिताची वाटत असली तरी उद्याच्या भविष्यासाठीची ती वाट विद्यार्थ्यांच्या जीवनात अंधार निर्माण करणारी ठरणार आहे.

शिकवणी लावली तरी मुलांचे शिक्षण खरंच होतं का? आपल्याकडील शिकवणीचे वर्ग हे मुलांचे शिक्षण करण्यासाठी नाही तर पालकांच्या मनातील मार्कांचा आलेख उंचावण्यासाठी आहे. पालकांना शिक्षणापेक्षा मुलांचे मार्क हवे आहेत. शिक्षण कसे होते याचा विचार केला जात नाही. परीक्षेत किती मार्क पडले यावर शिक्षणाचे मूल्यमापन होते. त्यामुळे जीवनासाठी शिक्षणाचा विचार, संस्कार, संवेदना, सहकार्य, श्रमप्रतिष्ठा, धर्मनिरपेक्षता मूल्य, जीवन कौशल्य, गाभा घटक, २१व्या शतकासाठीची कौशल्य किती रूजली यापेक्षा फक्त मार्क पालकांना महत्त्वाचे वाटत असतील तर आपण शिक्षणातून माणूस, समाज, राष्ट्र निर्माण करण्याचे स्वप्न पाहणे हे चुकीचेच ठरेल. शिकलेले पक्के होण्यासाठी चिंतन, मननाची गरज आहे. सातत्याच्या बौद्धिक प्रक्रियेमुळे मुलांना थकवा येतो आणि शिकण्याचा प्रवास थांबतो म्हणून विचार करायला हवा. ही वाट आज लाभदायी असली तरी हा थोडासा लोभ शिक्षण व्यवस्थेला गिळंकृत करण्याचा धोका आहे, म्हणून जागे राहण्याची गरज आहे.

**-संदीप वाकचौरे**

# ४० वर्षांपूर्वी या व्यक्तीने २५ हजार रुपयांचे कर्ज घेऊन सुरू केला व्यवसाय, जाणून घ्या कशी उभी केली ७५०० कोटींची कंपनी




Image Credited - Business Today

७२ वर्षांचे ए प्रताप रेड्डी यांना परिचयाची गरज नाही. तेलंगणातील सर्वात श्रीमंत व्यक्तींमध्ये त्यांची गणना होते. मात्र यामागे त्यांचा मोठा संघर्ष आहे. जर त्यांनी ४० वर्षांपूर्वी कर्ज घेण्याची जोखीम घेतली नसती, तर कदाचित ते आज जिथे आहे, तिथे पोहोचू शकले नसते. बँकेकडून २५ हजार रुपयांचे कर्ज घेऊन त्यांनी कंपनी सुरू केली.

सध्या ए प्रताप रेड्डी ७,५०० कोटी रुपयांचे मार्केट कॅप असलेली बालाजी अमाईन्स ही कंपनी चालवतात. रेड्डी यांनी एक यशस्वी उद्योगपती होण्यासाठी अत्यंत संयमाने काम केले आणि प्रतिकूल परिस्थितीतही हिंमत हारली नाही. आज ब्रँड स्टोरीमध्ये आम्ही तुम्हाला सांगणार आहोत की ए. प्रताप रेड्डी यांनी यशस्वी उद्योजक बनण्याचा प्रवास कसा केला.

प्रताप रेड्डी यांचे बालपण गरिबीत गेले. यामुळे त्यांना सर्व अडचणींवर मात करून जगात नाव कमावण्याची प्रेरणा मिळाली. रेड्डी यांना दररोज १० किलोमीटर चालत शाळेत जावे लागत होते. पण त्यांनी हिंमत न गमावता जगात नाव कमावण्याचा संकल्प केला.

ए प्रताप रेड्डी यांना आयुष्यात काहीतरी मोठे करायचे होते. यासाठी त्यांनी ४० वर्षांपूर्वी म्हणजेच वयाच्या २५ व्या वर्षी व्यावसायिक जगात पाऊल ठेवण्याचा निर्णय घेतला. अनेक छोट्या व्यवसायात त्यांनी हात आजमावला. यानंतर त्यांनी मोठा व्यवसाय करण्याचे ठरवले आणि केमिकल व्यवसायात उतरले. १९८८ मध्ये रेड्डी यांनी बालाजी अमाईन्स ही केमिकल कंपनी सुरू केली.

केमिकल कंपनी उघडण्यासाठी त्यांनी लहान व्यवसाय करून कमावलेली ३ कोटी रुपयांची गुंतवणूक केली. यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही आणि यशाच्या पायऱ्या चढत राहिले. त्यांनी रेड्डीज बालाजी अमाईन्सला जगातील आघाडीच्या रासायनिक कंपन्यांमध्ये स्थान मिळवून दिले. रेड्डीज बालाजी केमिकल्समध्ये सध्या १२ औद्योगिक युनिट्स आहेत. स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर हे त्याच्या यशाचे रहस्य आहे. विदेशी तंत्रज्ञानाऐवजी स्वदेशी तंत्रज्ञानाचा अवलंब करून त्यांनी रासायनिक उद्योगात खळबळ माजवली. यामुळे त्यांना किमती मोठ्या प्रमाणात खाली आणण्यास मदत झाली. एक चतुर्थांश किंमत कमी करून त्यांनी स्पर्धकांना तगडी टक्कर दिली.सध्या बालाजी अमाइन्स ही भारतातील सर्वात मोठी मिथिलामाइन उत्पादक कंपनी आहे ज्यामध्ये जवळपास ६०% मार्केट शेअर आहे. रेड्डीज कंपनीने आर्थिक वर्ष २०२२ मध्ये २,३०० कोटी रुपयांचा महसूल मिळवला. जे कंपनीकडे बाजारात काय आहे ते सांगते.

बिझनेस टुडेला दिलेल्या मुलाखतीत ए प्रताप रेड्डी म्हणाले की, ते अजूनही जोखीम घेण्यावर विश्र्वास ठेवतात. त्यांचा असा विश्र्वास आहे की व्यवसायात जोखीम घेणे हा एक शाश्र्वत आणि वाढ निर्धारीत व्यवसायाचा एक महत्त्वाचा घटक आहे.

# खूप मोठे आहे माहीचे ब्रँडिंग, निवृत्तीनंतरही कमावत आहे करोडो, एवढी आहे संपत्ती





Image Credited - Quora

महेंद्रसिंग धोनी हे सामान्य नाव नसून स्वतःची एक ओळख आहे. क्रिकेट जगतापासून ते व्यावसायिक जगतापर्यंत या नावाची वेगळी ओळख आहे. चेन्नई सुपर किंग्ज कुणाला आवडो वा ना आवडो, क्रिकेटमध्ये माही नक्कीच आवडतो. स्टेडियममधील गर्दी माहीला पाहण्यासाठी जास्त आणि क्रिकेट पाहण्यासाठी कमी येतात. यामुळेच त्याचे नाव व्यावसायिक जगतात मोठ्या प्रमाणात बोलते. माहीचे फॅन फॉलोइंग देखील नेहमीच उच्च आहे.

क्रिकेट सम्राट महेंद्रसिंग धोनी उर्फ माही याचा आज ४२ वा वाढदिवस आहे. तसे, माहीने खूप आधी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. पण त्यानंतर तो आयपीएलमध्ये चेन्नईकडून खेळतो. निवृत्तीनंतरही माही करोडोंमध्ये खेळतो. ब्रँड्स, जाहिरात, आर्मीची नोकरी अशा अनेक ठिकाणांहून त्याचे उत्पन्न येते. माहीची नेटवर्थ ऐकून तुम्हीही भारावून जाल. चला तर मग आम्ही तुम्हाला सांगतो की, निवृत्तीनंतर माही किती आणि कसा कमावतो.

महेंद्रसिंग धोनीची संपत्ती विराट आणि अमिताभ बच्चन यांच्यापेक्षा जास्त आहे. तो १०७० कोटींचा मालक आहे. धोनी एका महिन्यात ४ कोटींहून अधिक कमावतो, तर वर्षाला तो ५० कोटींहून अधिक कमावतो. माही आयपीएलसाठी १२ कोटी घेतो. त्याच वेळी, तो रांचीच्या सर्वाधिक करदात्यांच्या यादीत आहे.

धोनीने स्वतःवर बनवलेल्या 'एमएस धोनी: द अनटोल्ड स्टोरी' या चित्रपटातून जवळपास ३० कोटींची कमाई केली आहे. रिपोर्ट्सनुसार, त्याने रिती स्पोर्ट्स नावाच्या मॅनेजमेंट कंपनीतही भागीदारी घेतली आहे. याशिवाय त्याची कपडे आणि फुटवेअर ब्रँड कंपनीही आहे. माहीने फूड बिझनेसमध्येही पैसे गुंतवले आहेत.

धोनीने ३० ब्रँड्सच्या जाहिराती केल्या आहेत. धोनीने मास्टरकार्ड, ओरियो, जिओ सिनेमा, स्किपर पाइप, फायर-बोल्ट आणि गल्फ ऑइल सारख्या मोठ्या ब्रँडसाठी जाहिराती केल्या आहेत. याशिवाय, अनेक ब्रँड्स देखील आहेत, ज्यात णपरलरवशाू, इहरीरीं चरींीळ-ेपू, छशींाशवी आणि ऊीशरा ११ यांचा समावेश आहे. धोनीचे इन्स्टाग्रामवर ४३ दशलक्षाहून अधिक फॉलोअर्स आहेत.

जाहिराती व्यतिरिक्त, त्याने अनेक क्रीडा आणि थेट ग्राहक व्यवसायांमध्ये गुंतवणूक केली आहे. यामध्ये फिनटेक स्टार्टअप खाताबुक, प्री-ओन्ड कार ईकॉमर्स प्लॅटफॉर्म उरी२४, प्रोटीन फूड स्टार्टअप शाका हॅरी आणि ड्रोन सर्व्हिसेस स्टार्टअप गरुडा एरोस्पेस यांचा समावेश आहे. त्याचा स्वतः:चा फिटनेस आणि लाइफस्टाइल कपड्यांचा ब्रँड सेव्हनही आहे. तो चेन्नईयन एफसी, माही रेसिंग टीम इंडिया आणि फील्ड हॉकी टीम रांची रेज या फुटबॉल संघाचा सह-मालक देखील आहे.

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# आरोग्य

## पावसाळ्यात जास्त घाम येत असल्यास ५ पैकी कोणताही उपाय करुन बघा



पावसाळ्याच्या दिवसात वातावरण खूप आल्हाददायक वाटतं. पण पावसाळा अनेक आजार घेऊन येतो. विशेषत: या दिवसांमध्ये आर्द्रता खूप जास्त असते, त्यामुळे खूप घाम येतो आणि वातावरणात असलेल्या आर्द्रतेमुळे घाम सुकत नाही. इतकेच नाही तर घाम एका जागी बराच वेळ राहिल्यास तेथे जंतू आणि बॅक्टेरिया वाढू लागतात, ज्यामुळे इतर अनेक आजार होऊ शकतात. यामध्ये मुरुम, फंगल इन्फेक्शन यांसारख्या त्वचेशी संबंधित अनेक समस्यांचा समावेश होतो. त्यामुळे या दिवसांत जास्त घाम येण्यावर नियंत्रण ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

**पावसाळ्यात घाम येऊ नये म्हणून काय करावे**

**संत्र्याच्या सालीने आंघोळ करा** : पावसाळ्यात घाम येऊ नये म्हणून तुम्ही संत्र्याची साल वापरू शकता. संत्र्याची साले खूप सुगंधी असतात आणि त्यात असे घटक आढळतात, ज्यामुळे घाम येण्याची वारंवारता कमी होते. संत्र्याच्या सालीने आंघोळ करण्यासाठी संत्र्याची साले बादलीभर पाण्यात भिजत घालणे आवश्यक आहे. या पाण्याने सकाळी आंघोळ करावी. या पाण्याने आंघोळ केल्याने तुम्हाला दिवसभर ताजेतवाने वाटेल.

**एसेंशियल ऑयल वापरा** : तुम्ही तुमच्या आंघोळीच्या पाण्यात एसेंशियल ऑयल मिक्स करू शकता आणि या पाण्याने आंघोळ करू शकता. तुम्ही बाजारातून तुमच्यासाठी योग्य असलेले कोणतेही एसेंशियल ऑयल वापरू शकता, जसे की लॅव्हेंडर तेल, रोझमेरी तेल अंघोळीच्या पाण्यात मिक्स केले जाऊ शकते. परंतु हे लक्षात ठेवा की आंघोळीच्या पाण्यात तेलाचे फक्त काही थेंब घालावेत.

**अँटी-बॅक्टेरियल साबण वापरा** : पावसाळ्याच्या दिवसात खूप घाम येतो. घामामुळे बॅक्टेरिया येतात. हे टाळण्यासाठी अँटी-बॅक्टेरियल साबण वापरा. अँटी-बॅक्टेरियल साबणाच्या मदतीने घामाची समस्या कमी होत नसली तरी शरीरातील जंतू आणि बॅक्टेरिया काढून टाकता येतात. परिणामी मुरुम किंवा त्वचेशी संबंधित समस्या होण्याचा धोका कमी होतो.

**टॅल्कम पावडर वापरा** : पावसाळ्यात घाम येऊ नये म्हणून तुम्ही टॅल्कम पावडर वापरू शकता. बहुतेक घाम आपल्या अंडरआर्म्स आणि मानेमध्ये येतो. सामान्यतः शरीराच्या या भागांची विशेष काळजी घेतली जात नाही, ज्यामुळे त्वचेच्या अनेक समस्या उद्भवू शकतात. पावसाळ्यात त्यांची विशेष काळजी घ्या. आंघोळ केल्यानंतर हातांच्या खाली आणि मानेभोवती टॅल्कम पावडर लावा. तुमच्यासाठी अँटी-फंगल टॅल्कम पावडर किंवा एसेंशियल तेलावर आधारित टॅल्कम पावडर वापरणे चांगले होईल. अशी उत्पादने त्वचेसाठी खूप उपयुक्त आहेत.

**पावसाळ्यात हे उपाय करून पहा** : शरीराच्या कोणत्याही भागात घामामुळे इन्फेक्शन होत असेल तर तिथे एलोवेरा जेल लावा. यामुळे घाम येणे कमी होईल आणि संसर्ग टाळण्यासही मदत होईल.

आपण संक्रमित भागावर कोरफडाची पाने देखील वापरू शकता. पावसाळ्यात सुती कपडे घालणे खूप गरजेचे आहे. घाम शोषून घेणारे आणि हवा सहजतेने जाऊ देणारे कपडे घालणे फार महत्वाचे आहे. असे केल्याने घामामुळे होणारा त्रास कमी होईल.

## बंद नाकावर उपाय

सर्दीमुळे अनेकदा लोकांना ब्लॉक नोज अर्थातच बंद नाक या समस्येला सामोरे जावे लागते. या समस्येमुळे लोकांच्या दैनंदिन जीवनावर तसेच झोपेवरही परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत काही उपायांचा अवलंब करून ही समस्या टाळता येऊ शकते. बंद नाकावर काय उपचार करता येईल जाणून घ्या-



**बंद नाकावर उपाय**

बंद नाक उघडण्यासाठी तुम्ही स्टीम घेऊ शकता. अशावेळी गरम पाणी घ्या आणि त्यातून वाफ घ्या. असे केल्याने गरम हवा नाक आणि घशापर्यंत पोहोचते आणि फुफ्फुसांवर परिणाम करते. तुम्ही दिवसातून दोन ते तीन वेळा स्टीम घेऊ शकता. असे केल्याने तुम्ही बंद झालेल्या नाकापासून आराम मिळवू शकता.

नाक शेकणे देखील प्रभावी ठरेल. अशावेळी गरम पाण्यात टॉवेल भिजवा आणि नंतर नाकावर ठेवा. असे केल्याने नाकातील श्लेष्मा बाहेर पडेल. ही पद्धत दिवसातून दोनदा करु शकता.

अद्रकाच्या वापराने नाक बंद होण्याची समस्या देखील दूर केली जाऊ शकते. आल्यामध्ये अँटीऑक्सिडंट घटक आढळतात ज्यामुळे नाक बंद होण्यापासून आराम मिळतो. अशा परिस्थितीत तुम्ही आल्याचा चहा किंवा आल्याचे पाणी घेऊ शकता.

नाक बंद होण्याच्या समस्येवरही लसणाच्या सेवनाने मात करता येते. अशावेळी ३ ते ४ कळ्या घेऊन पाण्यात उकळा. आता या मिश्रणात हळद, काळी मिरी मिसळून सेवन करा. असे केल्याने आराम मिळू शकतो.

## डार्क चॉकलेट ने करा ब्लड-प्रेशर कंट्रोल!

आधीचे लोक हा फुकटचा सल्ला देत होते की चॉकलेट खाल्ल्याने दात खराब होतात, पण आता एका नवीन संशोधनात हे जाहीर झाले आहे की 'डार्क चॉकलेट' खाल्ल्याने आमचं डोकं शांत राहून उच्च रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत मिळते.

डार्क चॉकलेटमध्ये एंटीऑक्सीडेंटस जास्त प्रमाणात असते, जे आरोग्यासाठी फायदेशीर असते.

स्वीडनच्या संशोधकाच्या एका दलाने हे सांगितले की 'डार्क चॉकलेट' शरीरात त्याचप्रमाणे असर करते जसे रक्तदाबा नियंत्रित करण्यासाठी घेणारी एखादी गोळी.

संशोधनात हे ही सांगितले की या प्रकारचे चॉकलेट त्या एंजाइमला बधीत करतात ज्याने रक्तदाब वाढतो.

डार्क चॉकलेटमध्ये बऱ्याच मात्रेत 'कोकोवा' असतो, ज्यात केटेचींस आणि प्रोसाइनीडाइंस जास्त प्रमाणात असतात, जे रक्तदाबाला प्रभावित करतात.

संतुलित आहार आणि धूम्रपानापासून दूर राहून डार्क चॉकलेटचे सेवन केल्याने हृदय रोग नियंत्रित ठेवण्यास मदत मिळते. या प्रकारे संशोधनात हे जाहीर झाले आहे की चॉकलेटचे सेवन केल्याने ताण तणाव कमी होण्यास मदत मिळते.

## Microwave मध्ये या ५ गोष्टी कधीही पुन्हा गरम करू नका



आजच्या काळात आपल्या जीवनशैलीत खूप बदल झाले आहेत. आजकाल घरात किंवा ऑफिसमध्ये अन्न शिजवण्यासाठी किंवा गरम करण्यासाठी मायक्रोवेव्ह असतात. मायक्रोवेव्हमध्ये अन्न गरम करणे खूप सोपे आहे. तुमचा ग्लास किंवा प्लास्टिक टिफिन मायक्रोवेव्हमध्ये ठेवून तुम्ही अन्न सहज गरम करू शकता. पण तुम्हाला माहिती आहे का की मायक्रोवेव्हमध्ये काही गोष्टी गरम करणे तुमच्या आरोग्यासाठी हानिकारक आहे. वास्तविक, मायक्रोवेव्हमध्ये या गोष्टी पुन्हा गरम केल्याने अन्न बदलते, ज्यामुळे तुम्हाला गंभीर समस्यांना सामोरे जावे लागू शकते. जाणून घेऊया या पदार्थांबद्दल...

१. भात : भात मायक्रोवेव्हमध्ये पुन्हा गरम करू नये. भात पुन्हा गरम केल्याने अन्नातून विषबाधा होऊ शकते. वास्तविक, भातामध्ये बॅसिलस सिरियस नावाचा जीवाणू असतो. तांदूळ पुन्हा गरम केल्याने त्याचे प्रमाण वाढते. उष्णतेमुळे जीवाणू नष्ट होतात परंतु त्यामुळे बीजाणू निर्माण होतात जे विषासारखे असतात. बॅक्टेरियामुळे तुम्हाला जुलाब, उलट्या किंवा पोटदुखी सारख्या समस्या होऊ शकतात.

२. उकडलेले अंडे: उकडलेले अंडे कधीही मायक्रोवेव्हमध्ये पुन्हा गरम करू नये. मायक्रोवेव्हमध्ये अंडे गरम केल्याने ते प्रेशर कुकरसारखे गरम होते, ज्यामुळे अंड्याचा स्फोट होऊ शकतो. मायक्रोवेव्हमध्ये अंड्याचा स्फोट होत नसल्यास, ते तुमच्या प्लेट किंवा हातावर स्फोट होऊ शकते. त्यामुळे मायक्रोवेव्हमध्ये पुन्हा गरम करू नका.

३. पालेभाज्या: तुम्ही पालक किंवा ब्रोकोली सारख्या भाज्या मायक्रोवेव्हमध्ये पुन्हा गरम करू नयेत. एका अभ्यासानुसार, पालेभाज्या किंवा हिरव्या भाज्या मायक्रोवेव्हमध्ये पुन्हा गरम केल्याने त्यातील ९७% पोषक घटक नष्ट होतात. म्हणूनच तुम्ही ते मायक्रोवेव्हमध्ये गरम करू नये.

४. कॉफी: बरेच लोक ऑफिसमध्ये किंवा घरात मायक्रोवेव्हमध्ये कॉफी पुन्हा गरम करतात. मायक्रोवेव्हमध्ये कॉफी पुन्हा गरम करणे ही चांगली कल्पना नाही. पुन्हा गरम केल्यावर त्याची चव कमी होते आणि सुगंधही कमी होतो. एक प्रकारे, कॉफी पुन्हा गरम केल्याने ती खराब होते.

५. चिकन: मायक्रोवेव्हमध्ये चिकन पुन्हा गरम केल्याने साल्मोनेला दूषित होण्याचा धोका वाढतो. चिकन खाण्यापूर्वी, आपण ते चांगले शिजवावे जेणेकरून त्यातील सर्व जीवाणू नष्ट होतील. मायक्रोवेव्हमध्ये मांसाचे सर्व भाग पूर्णपणे शिजवले जात नाहीत त्यामुळे सॅल्मोनेलासारखे जिवंत जीवाणू जिवंत राहण्याची शक्यता जास्त असते.

## सौभाग्यसह आरोग्याशी आहे बेलपत्राचा संबंध, शिवलिंगावर अर्पण करण्यापूर्वी जाणून घ्या त्याचे फायदे





सनातन परंपरेत भगवान शिव ही अशी देवता आहे, जी फक्त पाणी आणि पाने अर्पण केल्याने प्रसन्न होते. हेच कारण आहे की त्यांचे भक्त त्यांना प्रसन्न करण्यासाठी पवित्र गंगाजल आणण्यासोबतच त्यांचे प्रिय बेलपत्र सुद्धा अर्पण करतात. देवांचा देव महादेव यांना केवळ बेलफळच नव्हे तर बेलपत्रही आवडते. सनातन परंपरेतील सौभाग्याशी संबंधित असलेल्या बेलपत्राचा संबंधही उत्तम आरोग्याशी आहे. सौभाग्य आणि आरोग्याच्या या पवित्र पानाबद्दल सविस्तर जाणून घेऊया.

शिवपूजेत बेलपत्र अर्पण केल्याने सुख आणि सौभाग्य देणारे बेलपत्र तुमच्या आरोग्यासाठीही खूप फायदेशीर ठरते. आयुर्वेदानुसार, भगवान शिवाच्या पूजेमध्ये वापरल्या जाणाऱ्या बेलपत्रामुळे सर्व शारीरिक वेदना दूर होतात आणि आरोग्य मिळते. बेलपत्रामधून काढलेला रस कुंडी चावलेल्या भागावर बारीक करून लावल्यास जळजळ कमी होते, तर त्यापासून बनवलेला दशाचा रस ताप आणि हृदय व श्र्वासाशी संबंधित आजार कमी करण्यासाठी खूप फायदेशीर मानला जातो. तसेच बेलपत्र चघळल्याने तोंडाचे व्रण दूर होतात, तर पोटातील जंत दूर करण्यासाठी हे खूप फायदेशीर मानले जाते. रोज रिकाम्या पोटी बेलपत्र खाल्ल्याने हृदय आणि पोटाशी संबंधित सर्व प्रकारचे आजार दूर होतात. याचा फायदा घेण्यासाठी तुम्हाला डॉक्टरांच्या सल्ल्यानेच ते योग्य प्रमाणात सेवन करावे.

हिंदू मान्यतेनुसार, जर एखाद्या भक्ताने श्रावण महिन्यात भगवान शंकराच्या पूजेमध्ये बेलपत्र अर्पण केले, तर भगवान शिव त्याची सर्वात मोठी इच्छा लवकर पूर्ण करतात. असे मानले जाते की जर शिवभक्ताने बेलाच्या झाडाखाली बसून भगवान शंकराचा अभिषेक केला, तर त्याला सर्व पापांपासून मुक्ती मिळते. तसेच शिवाच्या पूजेमध्ये बेलपत्रावर पांढऱ्या चंदनाने 'ओम' लिहून महादेवाला अर्पण केल्यास आणि प्रसाद समजून आपल्या धनस्थानावर ठेवल्यास त्याचे आर्थिक संकट दूर होतात. श्रावण महिन्यात जर कोणी बेलपत्र कच्च्या दुधात बुडवून शिवलिंगावर अर्पण केले, तर शिवाच्या कृपेने त्याला लवकरच संतानसुख प्राप्त होते, असाही समज आहे. अशाप्रकारे पाहिल्यास सर्व मनोकामना पूर्ण होण्यासोबतच बेलपत्रामुळे नशीब आणि आरोग्य लाभते.

## पावसाळ्यात डोकं सारखं करकर खाजतंय? हे तेल सोडवेल तुमचा त्रास



पावसाळ्यात गारवा येतोच पण त्यासोबत अनेक आजारही येतात. त्यामुळे या ऋतूत आपल्याला आरोग्याची तसेच खाण्यापिण्याची योग्य काळजी घ्यावी लागते. मात्र त्यासोबतच आपल्या केसांचीही जास्त काळजी घेणेही गरजेचे असते. पावसाच्या पाण्याच हवेतील प्रदूषण आणि विषारी घटकही असतात. अशा पाण्यात आपण भिजलो तर आपल्या केसांचे बरेच नुकसान होते.

यामुळेच पावसात भिजणे शक्यतो टाळावे. काही कारणाने भिजलातच तर केस लवकरात लवकर स्वच्छ पाण्याने धुवून वाळवावेत. केस गळतीची समस्याही इतर ऋतूंच्या तुलनेत पावसाळ्यात जास्त दिसून येते. त्यासोबतच जाणवणारा दुसरा त्रास म्हणजे डोक्यात किंवा टाळूला सुटणारी खाज. जे त्रासदायक तर असतेच पण त्यामुळे काहीवेळेस लाजिरवाणी परिस्थिती देखील उद्भवू शकते. हा त्रास कमी करण्यासाठी एका तेलाचा वापर करणे अतिशय फायदेशीर ठरते, ते म्हणजे जोजोबा ऑईल. जोजोबा ऑईल हे टाळूची खाज दूर करण्यास मदत करते, तसेच हे तेल केसांचे सौंदर्य देखील वाढवते.

**स्काल्प हायड्रेटेड राहतो**

डोक्याला खाज येण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे स्काल्प किंवा टाळूचा कोरडेपणा. ही समस्या दूर करण्यासाठी जोजोबा ऑईलचा वापर करा. हे तेल सेबम संतुलित करते, ज्यामुळे टाळू किंवा स्काल्प मॉयश्र्चराइझ राहते आणि त्यामुळे केस जास्त काळ हायड्रेटेड राहतात.

**सूज कमी करते**

जोजोबा ऑईलमध्ये सूज कमी करण्याचे गुणधर्म असतात, जे स्काल्पची सूज आणि जळजळ कमी करण्यास मदत करतात. त्यामध्ये ओमेगा -६ फॅटी सिड आणि ओमेगा -९ फॅटी सिड असते. तसेच हे तेल व्हिटॅमिन ई चाही उत्तम स्त्रोत आहे, ज्यामुळे स्काल्प हेल्दी राहतो.

**इन्फेक्शनपासून वाचवतो**

जोजोबा ऑईलमध्ये अँटी-फंगल आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात, ज्यामुळे स्काल्पची खाज दूर होते. तसेच संसर्ग होण्याची शक्यता कमी होते.

**कसा करावा वापर ?**

जोजोबा ऑईल वापरण्यापूर्वी थोडं कोमट करून घ्यावं. त्यानंतर ते स्काल्पवर लावून चांगला मसाज करावा. तुम्हाला हवे असेल तर तुम्ही त्यामध्ये नारळाचे तेल किंवा ऑलिव्ह ऑईलही मिक्स करू शकता. या तेलाने टाळूला हलक्या हातांनी मसाज करा आणि २ ते ३ तासांनी केस धुवा. यामुळे केसांच्या अनेक समस्या कमी होतात.

## पावसाळ्यात दही का खाऊ नये बरं?

पावसाळा हा सर्वांचा आवडता ऋतू आहे. गारवा घेऊन येणारा हा ऋतू त्याच्यासोबत अनेक आजारही घेऊन येत असतो. पावसाळ्यात अनेक आजार पसरण्याचा धोकाही



असतो. म्हणूनच या काळात आरोग्याची, तसेच खाण्या-पिण्याची विशेष काळजी घेणे गरजे असते. हेल्दी लाईफस्टाइल फॉलो केली पाहिजे. पावसाळ्याच्या ऋतूमध्ये काही पदार्थ खाणे वर्ज्य असते. त्यामध्ये दह्याचा (Curd) देखील समावेश असतो.

आयुर्वेदानुसार पावसाळ्याच्या ऋतूमध्ये दही खाऊ नये. ते खाल्ल्याने आरोग्याचे नुकसान होऊ शकते. पण या ऋतूत दही का खाऊ नये, हे तुम्हाला माहीत आहे का ? या ऋतूत दही खाल्ल्याने आरोग्याला कोणते नुकसान होते ? याबाबत तज्ञ काय सांगतात ते जाणून घेऊया.

वरिष्ठ डॉक्टरांच्या सांगण्यानुसार, पावसाळ्याच्या ऋतूमध्ये दही खाल्ल्याने त्वचेवर फोड येणे, पिंपल्स सारख्या समस्या उद्भवू शकतात. याशिवाय त्वचेवर खाज येण्याची समस्याही सुरू होऊ शकते. म्हणूनच या ऋतूत दही खाणे टाळावे. तसेच पावसाळ्यात ऋतूत दही खाल्ल्याने फंगल इन्फेक्शनची समस्याही वाढते. त्यामुळे पावसाळ्यात दही खाणे टाळावे, असे तज्ज्ञ सांगतात.

**पचनाशी संबंधित समस्या**

पावसाळ्याच्या दिवसात आपली पचनक्रिया तशीही थोडी मंदावते. त्यातच या ऋतूत आपण दही खाल्ले तर मेटाबॉलिज्म बिघडू शकते. त्यामुळे पचनाशी संबंधित समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे सिडीटी आणि बद्धकोष्ठतेचा त्रास होऊ शकतो. यामुळे, पोटात संसर्ग होण्याचा धोकाही बराच वाढतो. म्हणूनच या ऋतूत दही खाणे टाळावे. दही खाल्ल्याने आपली पचनशक्ती कमजोर होते. तसेच पावसाळ्यात दही खाल्ल्याने खोकला आणि सर्दी होऊ शकते, क्वचित तापही येऊ शकतोय ज्या लोकांना फुफ्फुसाची समस्या किंवा त्रास आहे, दही खाल्ल्याने त्यांचा त्रास आणखी वाढू शकतो. म्हणूनच पावसाळ्यात दही खाणे टाळावे.

**हाडांशी संबंधित समस्या**

डॉक्टरांच्या सांगण्यानुसार, पावसाळ्यात दही खाल्ल्याने हाडांशी संबंधित समस्याही उद्भवू शकतात. तसेच दही खाल्ल्याने आर्थ्रायटिसचा त्राही होऊ शकतो. त्यामुळे दही न खाणे उत्तम ठरते

## फक्त चविष्ट जेवण बनविण्यासाठीच नाही तर हे मसाले तुमच्या चेहऱ्यालाही बनवतात चमकदार!



आजच्या काळात चमकदार त्वचा मिळावी अशी प्रत्येकाची इच्छा असते. यासाठी लोक अनेक प्रकारच्या क्रीम आणि सीरमचा वापर करतात. पण तुम्हाला माहित आहे का की या गोष्टी महागड्या तसेच त्वचेसाठी हानिकारक ठरू शकतात. तर काही मसाले त्वचेसाठी फायदेशीर असतात. चला तर मग जाणून घेऊया असे कोणते मसाले आहेत ज्यामुळे तुमची त्वचा चमकदार होऊ शकते?

**हे मसाले त्वचा चमकदार बनवतात**

हळद : हळद शरीरासह त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे. हळद अँटीबॅक्टेरियल गुणधर्मांनी समृद्ध आहे आणि त्वचेत सुधारणा देखील करते. हळदीच्या वापराने पिंपल्स दूर होतात तसेच चेहऱ्यावरील डागही सहज दूर होतात. त्याचा वापर करण्यासाठी एक चमचा दही, अर्धा चमचा मध, पाव चमचा हळद मिसळून पेस्ट तयार करावी.

जायफळ : जायफळाच्या साहाय्याने त्वचाही सुधारता येते. जायफळ ही एक औषधी वनस्पती आहे जी त्वचेला अंतर्गत रित्या चांगलं करते. त्याचा वापर करण्यासाठी २ चमचे कच्च्या दुधात अर्धा चमचा जायफळ पावडर मिसळून पेस्ट तयार करावी. आता ही पेस्ट चेहऱ्यावर १० मिनिटे लावा. त्यानंतर चेहरा स्वच्छ पाण्याने धुवावा.

आलं : आलं शरीरासाठी खूप फायदेशीर आहे. याच्या वापराने त्वचेच्या अनेक समस्या दूर होतात. चेहऱ्यावर वापरण्यासाठी अर्धा चमचा आल्याचा रस अर्धा चमचा लिंबाचा रस आणि गुलाबपाणी मिसळून मिश्रण तयार करावे.

दालचिनी : दालचिनी आरोग्यासाठी तसेच त्वचेसाठी फायदेशीर आहे. याच्या वापराने पिंपल्स, डाग दूर होतात आणि त्वचा चमकदारही होते. याचा वापर करण्यासाठी दालचिनी पावडर घेऊन गुलाबपाण्यात मिसळून चेहऱ्यावर लावा.

**वाचकांना विनंती**

सांज दै. भूकंपच्या अंकात विविध विषयावर लेख असतात. या लेखातील मत, दावे याविषयी संपादक सहमत असतात असे नव्हे, दैनिकात प्रसिद्ध होणारे अग्रलेख संपादकाचे मत असते, याची जबाबदारी संपादकाची आहे. याची वाचकांनी नोंद घ्यावी.

- व्यवस्थापक, सांज दै. भूकंप, लातूर

लातूर भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com
LATUR BHUKAMP
शुक्रवार ७ जुलै २०२३


## प्रा. गणेश वानखेडे हिंदी विषयात महा. सेट परीक्षा २०२३ उत्तीर्ण

लातूर : दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद कला महाविद्यालयातील हिंदी विभागाचे विद्यार्थी श्री. गणेश वानखेडे हे महा सेट परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. सध्या ते महाविद्यालयाच्या संशोधन केंद्रातून हिंदी विषयात पीएच.डी. करत आहेत. मागील वर्षी त्यांनी एम.फिल. यशस्वी रीतीने पूर्ण केलेले आहे. म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी त्यांचा शॉल, पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान केला. त्यांच्या या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्था अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंद सोनवणे, उपाध्यक्ष प्रदीपकुमार राठी, उपाध्यक्ष तथा शालेय समिती अध्यक्ष ललीत शाह, संस्था सचिव रमेश बियाणी, संयुक्त सचिव सुरेश जैन, कोषाध्यक्ष संजय बोरा, संस्था नियामक मंडळ सदस्य मा. विशाल अग्रवाल, विशाल लाहोटी, अजिंक्य सोनवणे व संस्था पदाधिकारी यांनी कौतुक केले.

## दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्निकल एज्युकेशनच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

लातूर : राज्यात गुणवत्तेची खाण असलेल्या लातूर येथील दयानंद शिक्षण संस्था अंतर्गत दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्निकल एज्युकेशन विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशन मार्फत घेण्यात येणाऱ्या उन्हाळी २०२३ परीक्षेत घवघवीत यश मिळवले असून डिप्लोमा द्वितीय वर्षांमधून बाचेपल्लीकर हर्षदा गिरीश ८१%, पाटील ऐश्र्वर्या हनुमंत ७९.८०%, पांचाळ वैभवी सतीश ७९% गुण मिळवून महाविद्यालयात अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला. तर प्रथम वर्ष डिप्लोमा मधून कदम अंकिता पांडुरंग ८७.५०%, जाधव प्रतीक्षा प्रकाश ८४.५३% आणि तांदळे ऋतुजा अनंत ८३.६८% गुण मिळवून महाविद्यालयात अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला असून दयानंद शिक्षण संस्थेच्या विविध महाविद्यालयानी गुणवत्तेत भरारी घेत दयानंद पॅटर्न निर्माण केला आहे.

# भाजपा कार्यकर्त्यांनो, विचलित होऊ नका आपली नेतृत्वाला काळजी–आ. दरेकर

लातूर : महाराष्ट्र राज्यात राजकारणाच्या अनेक घडामोडी घडत आहेत. या सर्व घडामोडीचा उलगडा झाल्यानंतर कोणाच्याही मनात कसलीही शंका राहणार नाही तेव्हा भाजपाच्या कार्यकर्त्यांनी विचलित होऊ नये आपली पक्ष नेतृत्वाला आणि पक्षाला काळजी आहे असा विश्वास महाराष्ट्र विधान परिषदेतील भाजपा गटनेते आ. प्रवीण दरेकर यांनी दिला.

विधान परिषदेतील भाजपाचे गटनेते आमदार प्रवीणजी दरेकर हे लातूर जिल्हा दौऱ्यावर आले असता त्यांनी गुरुवारी सकाळी आ. कराड यांच्या संवाद भाजपा संपर्क कार्यालयात सदिच्छा भेट दिली असता उपस्थित भाजपा कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आ. दरेकर यांनी विश्वास दिला. प्रारंभी भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांनी आमदार प्रवीण दरेकर यांचा यथोचित सत्कार करून स्वागत केले. यावेळी खा. सुधाकर शृंगारे, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर, जिल्हा सरचिटणीस विक्रमकाका शिंदे, रेणापूर तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

लातूर जिल्हा भाजपाचा मजबूत जिल्हा आहे, या जिल्ह्यावर नेतृत्वाचे बारीक लक्ष असून भविष्यातही लातूर जिल्हा भाजपाचा बालेकिल्ला कायम असेल असे सांगून आ. प्रवीणजी दरेकर म्हणाले की सत्तेचा काळ येतो आणि जातो मात्र सत्तेचा लाभ घेण्यासाठी आपण काय प्रयत्न केला हा खरा प्रश्र्न महत्त्वाचा आहे. आपले सरकार कार्यकर्त्याच्या मागे उभे आहे शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून कार्यकर्त्यांनी सत्तेचा उपयोग करून घ्यावा. देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब २४ तास काम करतात, उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब अहोरात्र परिश्रम घेत आहेत तेव्हा जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवरील भाजपाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सतत कार्यरत असावे येणारा काळ हा भाजपाचाच असेल असे बोलून दाखविले.

प्रारंभी भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांनी जिल्ह्यातील भाजपाच्या कार्याचा आढावा दिला. यावेळी प्रदेश भाजपाचे अनिल भिसे, भागवत सोट, सतीश आंबेकर, बुथ अभियानाचे तुकाराम गोरे, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष साहेबराव मुळे, सुरज शिंदे संगायो समितीचे रेणापूर तालुकाध्यक्ष वसंत करमुडे, दीपक वांगस्कर, सज्जन लोणाळे, हनुमंतबापू नागटिळक, सुधाकर गवळी, अशोक सावंत, संभाजी वायाळ, शरद दरेकर, विजय चव्हाण, राजकारण साठे, रमा फुलारी, काशिनाथ ढगे, बालाजी दुटाळ, लक्ष्मण नगिमे, रुपेश काळे, नानासाहेब कस्पटे, ज्ञानेश्वर जुगल, ज्ञानोबा भिसे, ललिता कांबळे, लताताई भोसले, शीला आचार्य, अनुसया फड, श्रीकृष्ण जाधव श्रीकृष्ण पवार, अनंत पाटील, अच्युत भोसले, उत्तम चव्हाण, उज्वल कांबळे, वैजनाथ हराळे, गणेश चव्हाण, सुधाकर शिंदे, जलील शेख, माधव घुले, ईश्वर बुलबुले, बालासाहेब कदम, शंकर चव्हाण, संतोष चव्हाण, प्रशांत शिंदे, बालासाहेब कदम यांच्यासह अनेक भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले.

# विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गांनी योजनेचा लाभ घ्यावा–जिल्हा व्यवस्थापक

लातूर : सन २०२३–२०२४ या आर्थिक वर्षाकरीता वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळांतर्गत विमुक्त जाती, भटक्या जमाती व विषेश मागास प्रवर्गातील लोकांकरिता योजना राबविल्या जात आहेत. यात वैयक्तिक कर्जव्याज परतावा योजनेचे (IR-1)१००, गट कर्जव्याज परतावा योजनेचे (IR-2) ०२, बीज भांडवल कर्ज योजना १००, रूपये एक लाख थेटकर्ज योजना २०० असे उद्दिष्ट असून जिल्ह्यातील इच्छूक लाभार्थींनी अर्ज करण्याकरीता व आधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालय वसंतराव नाईक वि.जा.भ.ज विकास महामंडळ (मर्या.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, लातूर फोन. (०२३८२) २९९६०७ येथे संपर्क साधावा, असे अहवान जिल्हा व्यवस्थापक झोंबाडे पी.एम. यांनी केले आहे.

या योजनेमध्ये वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजनेची मर्यादा १० लाख पर्यत आसून अर्जदार हा विमुक्त जाती, भटक्या जमाती व विषेश मागास प्रर्वगातील असावा, अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्ष दरम्यान असावे, अर्जदाराचे बॅक खाते आधारकार्ड लिंक असणे आवश्यक आहे. सदर योजना ही ऑनलाईन असुन या करिता आधार कार्ड, रहीवाशी दाखला, उत्पन्नाचे प्रमानपत्र, जातीचा दाखला शाळेचा दाखला संबधीत व्यावसायचे कोटेशन व प्रकल्प अहवाल, WWW.VJNT.IN वेबसाईटवर मूळ कागदत्रासह अपलोड करणे आश्यक आहे.

करिता कर्जाची मर्यादा रू.१० लाख ते रू.५० लाखा पर्यत आसून या योजने अंतर्गत लाभ घेण्याकरिता, नोंदनीकृत गट असावा व गटातील सदस्य हे विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील असावा, गटातील सदस्याचे वय १८ ते ४५ वर्षापर्यंत असावे. गटातील लाभार्थींचे कर्ज खाते आधार कार्ड लिंक असणे आवश्यक आहे.

गटातील सर्व सदस्याचे सिबिल क्रेडिटस्कोअर किमान ५०० इतका असावा. उत्पन्नाची मर्यादा नॉनक्रिम्रीनल, करिता ८ लाखाच्या मर्यादीत असावी सदर योजना या ऑनलाईन योजना आसून या करिता सदस्याचे जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रहिवाशी, आधारकार्ड, शाळेचा दाखला, संबधीत व्यवसायाचे कोटेशन, प्रकल्प अहवाल सोबत सर्व मूळ कागदपत्रे वेबसाईटवर अपलोड करणे आवश्यक आहे.

या योजनेमध्ये महामंडळाकडून रू.१ लाख थेट कर्ज दिले जाते. योजनेसाठी दोन जामिनदार व बोझा नोंद करून देणे महत्वाचे आसून या करिता जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला (१ लाखापर्यत मर्यादा) रेशनकार्ड, आधारकार्ड, रहिवाशी इत्यादी कागद पत्रासह व्यवसायानुसार कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे या योननेचे फॉर्म महामंडळातून जातीचा मुळ दाखला व आधार कार्ड दाखवून रितसर नोंद करून अर्जदारास मिळेल.

बीज भांडवल योजना ही बॅंकेमार्फत राबविली जात आसून अर्जदाराने महामंडळाकडे जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रेशनकार्ड, रहिवाशी, पॅनकार्ड, व्यवसायानुसार आवश्यक कागदपत्र जोडून कार्यालयास दाखल करणे महत्वाचे आहे. या पूर्वी लाभार्थीने कर्जाचा लाभ घेतला आसल्यास त्यांना परत कर्ज प्रस्ताव दाखल करता येणार नाही.

# वीज पुरवठा तक्रारींबाबत महावितरणचा धडाका, दोन लाख तक्रारींचे दहा दिवसात निवारण

मुंबई : वीज ग्राहकांना गुणवत्तापूर्ण, दर्जेदार आणि ग्राहकाभिमूख सेवा देण्याच्या उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी कंपनीच्या अधिकाऱ्यांना वीज पुरवठा बंद झाल्याच्या तक्रारींचे प्राधान्याने निवारण करण्याची सूचना दिली. त्यानंतर कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अवघ्या दहा दिवसात जुन्या प्रलंबित आणि नव्या अशा दोन लाख तक्रारींचे निवारण केले. त्याच सोबत बिलांबाबतच्या एक लाख ४२ हजार तक्रारींचे निवारणही दहा दिवसात युद्ध पातळीवर करण्यात आले.

महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून सूत्रे स्वीकारल्यानंतर मा. लोकेश चंद्र यांनी वीज ग्राहक हा केंद्रबिंदू मानून सेवा देण्याची सूचना कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिली आहे. त्यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत दि. २० जून रोजी ग्राहकांच्या तक्रारींचा आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी वीज पुरवठा बंदच्या तक्रारींचे प्राधान्याने निराकरण करण्याचा स्पष्ट आदेश दिला. पावसाळी हवामानात वीज पुरवठा बंद झाल्याच्या तक्रारी वाढू शकतात हे ध्यानात घेऊन काम करण्यास सांगितले. त्यानंतर कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी युद्ध पातळीवर प्रयत्न करून दहा दिवसात वीज पुरवठा बंदच्या दोन लाख तक्रारींचे निवारण केले.

महावितरणने विशेष उपक्रम राबवून ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण केले. गेल्या दहा दिवसात नव्याने दाखल झालेल्या वीज पुरवठा बंदच्या १,३८,०७२ तक्रारींचे निवारण करण्यात आले. त्यासोबत आधीच्या प्रलंबित ६७,००० तक्रारीही निकाली काढण्यात आल्या. वीज पुरवठा बंदच्या तक्रारींचे निवारण करताना या तक्रारी लवकरात लवकर म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या काल मर्यादेत दूर व्हाव्यात यावर भर देण्यात येत आहे.

बिलांच्या बाबतीत एकूण १,४२,६०० तक्रारींचे दहा दिवसात निराकरण करण्यात आले. त्यापैकी १,१०,९२० तक्रारी दि. २० जूनपूर्वी दाखल झालेल्या होत्या. त्यासोबत दि. २० जूननंतरच्या ३१,६८७ तक्रारींचेही निराकरण करण्यात आले. यामध्ये बिल दुरुस्तीच्या ४३,४६० तक्रारींचे निवारण समाविष्ट आहे.

अध्यक्षांच्या सूचनेनुसार महावितरणच्या मुख्यालयात वीज ग्राहकांच्या राज्यभरातील तक्रारींचा व त्यावर केलेल्या उपायांचा नियमित आढावा घेण्यात येत आहे. कंपनीचे वरिष्ठ अधिकारी याबाबत देखरेख करत आहेत.

# जैवतंत्रज्ञान, जीवविज्ञान आणि सूक्ष्मजीवशास्त्रातील नाविन्यपूर्ण संशोधन काळाची गरज : डॉ. आलापुरे

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि. ०६ जुलै २०२३ रोजी जैवतंत्रज्ञान विभागाच्या वतीने ' विज्ञान मार्गाच्या संशोधनात करिअरच्या संधी ' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड होते.याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख व कार्यक्रम समन्वयक डॉ.कोमल गोमारे व प्रमुख पाहुणे म्हणून अमेरिका येथील डॉ.भागवत आलापुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदरील कार्यक्रमाच्या अंतर्गत डॉ. आलापुरे यांनी पदवी व पदव्युत्तर शिक्षणानंतर संशोधन क्षेत्रातील देशांतर्गत आणि देशाबाहेरील संधीना उजाळा दिला. डॉ.आलापुरे हे न्यूरोसायन्स आणि नेत्रविज्ञान,लुईशियाना स्टेट युनिव्हर्सिटी हेल्थ सायन्सेस सेंटर न्यू ऑर्लीस अमेरिकन संघराज्य येथे सीनिअर सायंटिस्ट असून ते मेडिकल सायन्समधील विद्यार्थ्यांना प्राणी शरिरशास्त्र या विषयाचे मार्गदर्शन करतात. डॉ.आलापूरे यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन काळातील कार्याचे मार्गदर्शन करून विज्ञानातील विविध क्षेत्रात असणाऱ्या संधीवरती सविस्तर मार्गदर्शन केले.संशोधनाच्या काळामध्ये मिळणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील विविध संस्था जसे की, डीआरडीओ, डी.एस.टी. आयसीएमआर सारख्या संस्था अनुदान देऊ करतात, याबद्दलही मार्गदर्शन केले.जैवतंत्रज्ञान अंतर्गत वापरल्या जाणाऱ्या नवीन टेक्नॉलॉजीचा वापर करून उशीर डिसीजवरती काम करून ट्रान्सजेनिक उंदीरमधील केटरॅकवरील संशोधनावर मार्गदर्शन केले. एक दिवसीय सत्रामधील विद्यार्थ्यांच्या मनातील संशोधनाविषयी असणाऱ्या अडचणी सोडवून,भविष्यात असणाऱ्या जीवविज्ञानातील संशोधन संधीवरती मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांनी दयानंद विज्ञान महाविद्यालय शिक्षकांबरोबर विद्यार्थ्यांच्या विज्ञान व तंत्रज्ञानातील संशोधनाकडे लक्ष सातत्याने लक्ष देते.महाविद्यालय विद्यार्थ्यांना संशोधनासाठी लागणारी मदत करण्यास नेहमी तत्पर असते व त्यासाठी शिष्यवृत्तीही देण्यात येते असे त्यांनी सांगितले.भारतासाठी सी.व्ही.रमणनंतर विज्ञानामध्ये एकही नोबेल पारितोषिक मिळवणारा संशोधक तयार झाला नाही अशी खंत व्यक्त करताना भविष्य नक्कीच आश्र्वासक असेल असे मत त्यांनी मांडले.याचबरोबर विद्यार्थ्यांनी आपले भावी आयुष्य उज्ज्वल करण्यासाठी जैवतंत्रज्ञानातील अनेक नवनवीन संकल्पना व त्यातून संशोधन,तसेच उद्योग आदिंच्या माध्यमातून कठोर परिश्रम घेऊन सक्षमपणाने स्वत:चे करिअर घडवले पाहिजे असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ.कोमल गोमारे,जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख यांनी करून दिले.सूत्रसंचालन प्रा.स्वरूप गावकरे यांनी केले तर आभार प्रा.अवंती बिडकर यांनी मानले.

याप्रसंगी डॉ.राहुल मोरे, डॉ.चंद्रशेखर स्वामी, डॉ.रवी साळुंके, प्रा.मेघा पंडित,डॉ.मनीषा गुरमे, डॉ.विजेंद्र चौधरी, डॉ.विश्र्वनाथ मोटे, डॉ.आर.कीर्तने, प्रा.शिवाजी आळणे, डॉ.महादेव पंडगे, डॉ.महेश करळे, डॉ.सुरज कोल्हे, डॉ.अमोल ठोसर, डॉ.ढेरे, डॉ.शंकर बिराजदार, डॉ.रामशेट्टी शेटकार, प्रा.श्र्वेता लोखंडे, डॉ.टी.एच.मुजावर, प्रा.आजाम, प्रा. धुतेकर इत्यादी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभागातील प्रा.मयूरी जाधव, डॉ.फिरदोस बिरादार, प्रा.श्रीनिवास कुलकर्णी, व शिक्षकेत्तर कर्मचारी विशाल टार्फे,संतोष सूर्यवंशी,श्रावण माळी,लक्ष्मण शिंदे,शंकर सूर्यवंशी,श्रीमती हलसे यांनी प्रयत्न केले. तसेच जैवतंत्रज्ञान, जीवविज्ञान शाखेतील पदवी व पदव्युत्तर वर्षातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# दयानंद कला महाविद्यालयात इ. ११ वी च्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ

लातूर : दयानंद कला महाविद्यालयात ओळख महाविद्यालयाची इयत्ता अकरावी प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य श्री अनिलकुमार माळी, पर्यवेक्षक डॉ.दिलीप नागरगोजे यांनी अकरावीच्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन व महाविद्यालयाचा परिचय करून दिला. आपल्या मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांनी आपल्यामध्ये शिस्त व धाडस या गुणाची जोपासना करावी. निरागस शांतता हीच परिवर्तनाची नांदी ठरते. आपली पात्रता सिद्ध करण्यासाठी महाविद्यालयामध्ये स्वगुण वाढ योजना राबवली जाते. त्याचबरोबर संगीत, क्रीडा, सांस्कृतीक कार्यक्रमांमधून उत्तम नागरिक घडवण्याचे काम सर्व प्राध्यापक व महाविद्यालय करते. विद्यार्थ्यांनी आपल्या मधील सुप्त गुण ओळखुन त्या दिशेने प्रयत्न केले पाहिजेत. यामध्ये स्पर्धा परीक्षा, वैयक्तीक खेळ, चित्रकला, संगीत, चित्रपट, नाटक यांची तयारी करून स्वता:ला घडवावे. यातुनच तुम्ही उत्तम प्रशासकीय अधिकारी व यशस्वी नागरिक होऊ शकता. विद्यार्थ्यांनी सिनेमा, नाटक पाहून आपले मत व्यक्त करावे. त्यासाठी महाविद्यालय सर्वांना अभिव्यक्तीचे स्वातंत्र देते. वर्तमानपत्राचे वाचन करून आपल्या मनातील न्यूनगंडाची भावना दूर करुन त्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा तुमच्या मधील नव्या वादळाला दिशा देण्यासाठी हे महाविद्यालय नेहमी तत्पर असते.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री अनिलकुमार माळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थी वर्गात किंवा वर्गाबाहेरही शिक्षण घेत असतो. दोन्ही प्रकारचे अनुभव घेत तो मोठा होतो. आपल्या महाविद्यालयाच्या निकालाची उज्वल परंपरा तुम्ही सर्वजण पुढे चालवणार आहात. आणि त्यामधूनच नवीन अधिकारी, वकील, समाजसेवक घडले जाणार आहेत. गरीब विद्यार्थ्यांसाठी दत्तक योजना महाविद्यालय राबवत असते. गरीब, होतकरु विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा. असे प्रतिपादन या वेळी केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक डॉ. दिलीप नागरगोजे यांनी केले. आपल्या मनोगतात त्यांनी सामाजिक शास्त्राचा आभ्यास करण्यासाठी कला शाखा महत्वाची आहे. कला शाखे मधुनच उत्तम प्रशासकीय अधिकारी, कलाकार घडले आहेत व इतिहास घडविला आहे. विद्यार्थ्यांनी गोल्डकार्डचा वापर करुन ग्रंथालयामधील ज्ञानाच्या भांडाराचा उपयोग करुन आपल्या जीवनाला दिशा द्यावी. पैशावाचून कोणत्याही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होणार नाही व शिक्षणापासून वंचीतही राहणार नाही याची दक्षता दयानंद शिक्षण संस्था व दयानंद कला महाविद्यालय घेते. विद्यार्थ्यांनी ग्रंथालय, क्रीडांगण, वर्गखोल्या, स्मार्टबोर्ड यांची प्रत्यक्ष पाहणी करुन माहिती घेतली. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर महाविद्यालयात प्रवेश घेतल्याचा आनंद ओसंडून वाहत होता. व प्रत्यक्ष वर्गात अध्ययन करण्याची आतुरता जाणवत होती. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. दिनेश जोशी यांनी केले. व आभार प्रा. सुरेश क्षीरसागर यांनी मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. संदीप जगदाळे, डॉ. गोपाल बाहेती, डॉ. दयानंद शिरुरे, डॉ. देवेंद्र कुलकर्णी, डॉ. प्रशांत दिक्षीत, प्रा. शांता कोटे, प्रा. शैलेश सुर्यवंशी, प्रा. विलास कोमटवाड, प्रा. शिवाजी राठोड, प्रा. जिगाजी बुद्रुके, प्रा. दशरथ ननवरे, डॉ. सुधीर गाडवे, प्रा. महेश जंगापल्ले, प्रा. रत्नाकर केंद्रे यांनी परिश्रम घेतले.

श्री.तिरुपती ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३,
मो.९४०४६८२९९९

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777


SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते

## टी.सी. व कागदपत्रे हरवली आहेत

गुरव प्रसाद शंकर या विद्यार्थ्याची महाराष्ट्र विद्यालय, किल्लारी ता. औसा जि. लातूर येथून इयत्ता १२ वी (विज्ञान) पास झाल्याची टी.सी. व इतर महत्वाच्या मुळ कागदपत्रांची बॅग किल्लारी ते लातूर प्रवासा दरम्यान हरवली आहे. तरी कोणास सदर बॅग आढळल्यास खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा.

संपर्क:- मो. नं. ७०५८५८४५८८

## टी.सी. व कागदपत्रे हरवली आहेत

मोरे पवन निळकंठ या विद्यार्थ्याची महाराष्ट्र विद्यालय, किल्लारी ता. औसा जि. लातूर येथून इयत्ता १२ वी (विज्ञान) पास झाल्याची टी.सी. व इतर महत्वाच्या मुळ कागदपत्रांची बॅग किल्लारी ते लातूर प्रवासा दरम्यान हरवली आहे. तरी कोणास सदर बॅग आढळल्यास खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा.

संपर्क :- मो. नं. ७०५८५८४५८८

## CHANGE OF NAME

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **LAXMAN UDHAVRAO JADHAV TO : LAXMANRAO UDHAVRAO JADHAV** HENCE FOR THIS DECLARATION

I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **LAXMANRAO UDHAVRAO JADHAV** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE.

**OLD NAME : LAXMAN UDHAVRAO JADHAV**
**NEW NAME : LAXMANRAO UDHAVRAO JADHAV**
**ADDRESS :- SIDDHESHWAR HOUSING SOCIETY AUSA ROAD NEAR KALIKA DEVI MANDIR LATUR**

## CHANGE IN NAME

I have change my name from **NARESH SURESHCHANDRA JAIN to NARESH SURESH JAIN** hence for this declaration in future.

**OLD NAME : NARESH SURESHCHANDRA JAIN**
**NEW NAME : NARESH SURESH JAIN**

In future the same name will be used by my spouse and children.

**ADDRESS : PREM PRATIK, AMBAJOGAI ROAD, GURUKRUPA COLONY, LATUR DIST. LATUR (M.S.) - 413512**
**Adhar No. - 2998 7141 7262**
**Mobile - 9421364907**

## CHANGE OF NAME

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **CHHAYA RANGRAO NIRAS TO : CHAYA RANGRAO NIRAS** HENCE FOR THIS DECLARATION

I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **CHAYA RANGRAO NIRAS** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE.

**OLD NAME : -CHHAYA RANGRAO NIRAS**
**NEW NAME : -CHAYA RANGRAO NIRAS**
**ADDRESS :- RAMKRISHNA NIVAS KAREGAON ROAD NEAR DESHMUKH HOTEL VIKAS NAGAR PARBHANI.**

## CHANGE OF NAME

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER : **PRABHU LAXMAN JADHAV TO : PRABHU LAXMANRAO JADHAV** HENCE FOR THIS DECLARATION

I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE **PRABHU LAXMANRAO JADHAV** IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY HUSBAND / WIFE, CHILDREN AND RELATIVE.

**OLD NAME : -PRABHU LAXMAN JADHAV**
**NEW NAME : -PRABHU LAXMANRAO JADHAV**
**ADDRESS :- SIDDHESHWAR HOUSING SOCIETY AUSA ROAD NEAR KALIKA DEVI MANDIR LATUR**